

# तिरुक्कुरळाचा अभ्यास करूया

## Thirukkural Payilvom

(Marathi)

காசி தமிழ் சங்கமம்
काशी तमिल संगमम्
KASHI TAMIL SANGAMAM

## Kashi Tamil Sangamam 5.0

"Thirukkural Payilvom – Thirukkural Abhyas Karen"

*Translator*

Mrs Padma Sridha

Central Institute of Classical Tamil, Chennai

2026

# अनुक्रमणिका

प्रकरण 1 – काशी आणि तमिळनाडू 3

प्रकरण 2 – संत तिरुवल्लुवर यांचे जीवनचरित्र 6

प्रकरण 3 – तिरुक्कुरळची ग्रंथरचना आणि वैशिष्ट्ये 8

प्रकरण 4 – टीकाकार आणि तिरुक्कुरळाच्या प्रकाशनाचा इतिहास 11

प्रकरण 5 – वान्मरै वल्लुवम् 12

5.1 तिरुक्कुरळातील प्रेम आणि सदाचार 12

5.2 तिरुक्कुरळातील अतिथी-सत्कार 15

5.3 तिरुक्कुरळातील जीवप्रेम 17

5.4 तिरुक्कुरळातील संन्यासधर्म 19

5.5 ति.रुक्कुरळातील व्यक्तिगत आचारसंहिता 20

5.6. तिरुक्कुरळातील आत्मविश्वासाचे विचार 21

5.7. तिरुक्कुरळातील शिक्षण 23

5.8 तिरुक्कुरळातील नेतृत्वगुण 24

5.9 तिरुक्कुरळातील शारीरिक आरोग्य 26

5.10 तिरुक्कुरळातील वैद्यकीय नीती 27

5.11 तिरुक्कुरळातील मानसिक आरोग्यासाठीचे जीवनविषयक विचार 28

5.12 तिरुक्कुरळातील मानवतावाद 29

5.13 तिरुक्कुरळातील सामाजिक सलोखा 30

5.14 तिरुक्कुरळातील मैत्री 31

5.15 तिरुक्कुरळातील राजकारण 32

5.16 तिरुक्कुरळातील प्रशासकीय कौशल्य 33

5.17 तिरुक्कुरळातील आर्थिक विचार 34

5.18 तिरुक्कुरळातील शेती 35

5.19 तिरुक्कुरळातील पर्यावरण 37

5.20 तिरुक्कुरळातील कौटुंबिक नीती 38

5.21 तिरुक्कुरळातील स्त्रिया 39

5.22 तिरुक्कुरळातील व्यवस्थापन 40

5.23 जगातील विविध भाषांमधील तिरुक्कुरळ 42

प्रकरण – ६ : कुरळमणिमाला 43

# प्रकरण 1 – काशी आणि तमिळनाडू

काशी आणि तमिळनाडू यांचा दीर्घ आणि प्रदीर्घ ऐतिहासिक संबंध आहे. काशी अर्थात वाराणसीचा उल्लेख तमिळच्या प्राचीन अभिजात साहित्यामध्ये आढळतो. कलित्तोकै, सिलप्पदिकारम्, मणिमेकलै, नीलकेसी, चूडामणी, पेरुंगदै, विल्लिभारतम्, तेवारम्, पेरियपुराणम्, नालायिर दिव्यप्रबंधम्, तिरुप्पुगळ, शिवभोगसारम्, तिरुविलैयाडळ पुराणम्, काञ्चीपुराणम्, शिवज्ञानपालय स्वामीगळ कलंबकम्, तिरुवरुट्पा, वीरपांडिय कट्टबोम्मन कथैपाडल, भारतीयर कवितैगळ, कविमणी यांचे मलरुम् मालयुम् इत्यादी ग्रंथांमध्ये काशीविषयीची माहिती आढळते. याशिवाय, शिलालेख आणि ताम्रपटांमध्येही यासंबंधीचे पुरावे उपलब्ध आहेत. काशी कलंबकम्, काशी तुंडिविनायकर पदिगम्, काशीकांडम्, काशी रहस्यम्, काशी यात्रा, काशी माहात्म्यम् किंवा सिंहध्वजन कथा, काशी विश्वनाथ शतकम्, श्रीकाशी यात्रा दीपम् इत्यादी ग्रंथ काशीविषयी रचण्यात आले आहेत. या सर्व साहित्यिक आणि ऐतिहासिक पुराव्यांवरून काशी आणि तमिळनाडू यांच्यात प्राचीन काळापासून सातत्याने असलेला दृढ संबंध स्पष्टपणे दिसून येतो.

या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा विचार करता, काशी तमिळ संगम आयोजित करण्यामागे अनेक महत्त्वाचे उद्देश आहेत. त्यामध्ये काशी आणि तमिळनाडू यांच्यातील ऐतिहासिक संबंधांचा पुनर्शोध घेणे, दोन्ही ज्ञानपरंपरांचा एकत्रित परिचय करून देणे आणि त्यांच्यातील परस्परसंबंध सर्वांसमोर मांडणे, तसेच दीर्घकाळापासून चालत आलेले नागरी व सांस्कृतिक संबंध आणि त्यांचे सातत्य अधोरेखित करणे, हे प्रमुख उद्देश आहेत. याशिवाय, 'एक भारत – श्रेष्ठ भारत' या संकल्पनेच्या माध्यमातून विविध भारतीय सांस्कृतिक परंपरांचा परिचय करून देत राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ करणे, ज्ञानाच्या आदान-प्रदानाला प्रोत्साहन देणे आणि संपूर्ण देशात तमिळ भाषा व अभिजात तमिळ साहित्याची ओळख करून देणे, हेही या उपक्रमाचे उद्देश आहेत. त्याचबरोबर, तरुण पिढीला भारतीय सांस्कृतिक परंपरेशी जोडणे आणि तंत्रज्ञानाच्या साहाय्याने भारतीय भाषांमधील परस्पर भाषिक संबंध अधिक दृढ करणे, यांनाही या उपक्रमात महत्त्व देण्यात आले आहे. या विविध उद्देशांच्या पूर्ततेसाठी भारत सरकारच्या केंद्रीय शिक्षण मंत्रालयामार्फत 'काशी तमिळ संगम' हा उपक्रम राबविला जात आहे.

काशी आणि तमिळनाडू यांच्यातील दृढ संबंध अधोरेखित करण्यासाठी आतापर्यंत चार काशी तमिळ संगम आयोजित करण्यात आले आहेत. या संगमांमध्ये अनुक्रमे काशी आणि तमिळनाडू यांच्यातील संबंध, ज्ञानविषयक आणि सांस्कृतिक संबंधांचे दृढीकरण, भारतीय ज्ञानपरंपरेतील अगस्ती ऋषींचे योगदान आणि 'तमिळ शिकूया' या विषयांना केंद्रस्थानी ठेवण्यात आले होते. याच उपक्रमाची पुढची पायरी म्हणून यावर्षी वाराणसी येथे **'तिरुक्कुरळाचा अभ्यास करूया'** या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित काशी तमिळ संगम 5.0 चे आयोजन २८.११.२०२६ ते १२.१२.२०२६ या कालावधीत करण्यात येत आहे.

## काशी – तमिळनाडू : ऐतिहासिक संबंधांचे धागे

गंगेच्या तीरावर वसलेली काशी आणि वैगई व कावेरीच्या तीरावर वसलेले तमिळनाडू ही भारतातील अत्यंत प्राचीन ज्ञानकेंद्रे आहेत. या दोन्ही ज्ञानकेंद्रांना जोडणारे काही संबंधांचे धागे शतकानुशतके अखंडपणे चालत आले आहेत:

- कुमारगुरुपरर (१७वे शतक): धर्मपुरम् आधीनमशी संबंधित असलेल्या कुमारगुरुपरर यांनी काशी येथे कुमारस्वामी मठाची स्थापना केली आणि केदार घाटावर केदारेश्वर मंदिराची उभारणी केली. त्यांनी 'काशी कलंबकम्' या ग्रंथाची रचना केली. काशी येथेच त्यांनी आपले जीवनकार्य पूर्ण करून ईश्वरचरणी विलीन झाले.
- महाकवी सुब्रमण्य भारती: १८९८ ते १९०२ या काळात ते काशी येथील हनुमान घाटावर वास्तव्यास होते. त्यांनी वास्तव्य केलेल्या घराचे नूतनीकरण करून त्याला 'भारती इल्लम' (भारती निवास) असे नाव देण्यात आले. या घराचे उद्घाटन ११ डिसेंबर २०२२ रोजी करण्यात आले. 'काशीनगरीतील विद्वानांचे विचार कांचीपुरममध्ये ऐकता यावेत, यासाठी आपण एक साधन निर्माण करूया,' अशी त्यांची कल्पना होती. त्यांच्या या ओळींतून उत्तर भारत आणि दक्षिण भारत यांना ज्ञानाच्या माध्यमातून जोडण्याचे त्यांचे स्वप्न व्यक्त होते.

- तेनकाशी आणि शिवकाशी: ‘दक्षिण काशी’ हे नावच काशीशी असलेले नाते स्पष्ट करते. १५-व्या शतकातील पांड्य राजा पराक्रम पांड्य यांच्याशी येथील मंदिरांचा संबंध जोडला जातो. तेनकाशीचे पांड्य राजा अतिवीरराम पांड्य यांनी ‘काशीकांडम्’ या ग्रंथाची रचना केली.
- “सर्व जल गंगाजल, सर्व भूमी काशी”: पांड्य राजपरंपरेत प्रचलित असलेल्या या उक्तीचा उल्लेख पंतप्रधानांनी २०२३ मध्ये काशी तमिळ संगमाच्या उद्घाटन समारंभात केला होता.
- काशी–रामेश्वरम् यात्रा: काशीची यात्रा रामेश्वरम्च्या दर्शनानेच पूर्ण होते, अशी श्रद्धा दीर्घकाळापासून प्रचलित आहे. तमिळ विवाहसोहळयात आजही ‘काशी यात्रा’ हा विधी पार पाडला जातो.
- शैक्षणिक सेतू: माननीय भारताचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी ११ सप्टेंबर २०२१ रोजी, महाकवी सुब्रमण्य भारती यांच्या शताब्दी स्मृतिदिनानिमित्त, बनारस हिंदू विद्यापीठात ‘सुब्रमण्य भारती तमिळ अध्ययन पीठ’ स्थापन करण्यात येईल, अशी घोषणा केली.

**काशी तमिळ संगमाचा प्रवास:**

ज्ञानपरंपरा आणि सांस्कृतिक संबंध अधिक दृढ करणे, तमिळ शिकूया

**काशी तमिळ संगम 1.0**

- ‘काशी आणि तमिळनाडू यांच्यातील संबंध’ या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित काशी तमिळ संगम **1.0** हा उपक्रम उत्तर प्रदेशातील वाराणसी येथील बनारस हिंदू विद्यापीठाच्या परिसरात १६ नोव्हेंबर २०२२ ते १५ डिसेंबर २०२२ या कालावधीत आयोजित करण्यात आला होता.

**काशी तमिळ संगम 2.0**

- ‘ज्ञानविषयक आणि सांस्कृतिक संबंध अधिक दृढ करणे’ या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित काशी तमिळ संगम **2.0** हा उपक्रम उत्तर प्रदेशातील वाराणसी येथील नमो घाटावर १७ डिसेंबर २०२३ ते ३० डिसेंबर २०२३ या कालावधीत आयोजित करण्यात आला होता.

**काशी तमिळ संगम 3.0**

- ‘भारतीय ज्ञानपरंपरेतील महर्षी अगस्त्य यांचे योगदान’ या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित काशी तमिळ संगम **3.0** हा उपक्रम उत्तर प्रदेशातील वाराणसी येथील नमो घाटावर १५ फेब्रुवारी २०२५ ते २४ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आला होता.

**काशी तमिळ संगम 4.0**

- ‘तमिळ शिकूया’ या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित काशी तमिळ संगम **4.0** हा उपक्रम उत्तर प्रदेशातील वाराणसी येथील नमो घाटावर २ डिसेंबर २०२५ ते १५ डिसेंबर २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आला होता. काशी तमिळ संगमाचा समारोप समारंभ ३० डिसेंबर २०२५ रोजी तमिळनाडूतील रामेश्वरम् येथे झाला.

**काशी तमिळ संगम 5.0**

- ‘तिरुक्कुरळाचा अभ्यास करूया’ या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित काशी तमिळ संगम **5.0** हा उपक्रम उत्तर प्रदेशातील वाराणसी येथील नमो घाटावर २८ नोव्हेंबर २०२६ ते १२ डिसेंबर २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात येत आहे.
- काशी तमिळ संगम **5.0** चे वैशिष्ट्य म्हणजे ‘तिरुक्कुरळाचा अभ्यास करूया’ ही संकल्पना केंद्रस्थानी ठेवण्यात आली आहे. संपूर्ण भारतातील १,००० महाविद्यालये आणि विद्यापीठांमधून प्रत्येकी एका विद्यार्थ्याची निवड करून एकूण १,००० विद्यार्थ्यांना या उपक्रमात सहभागी करून घेतले जाणार आहे. हे विद्यार्थी आपल्या मातृभाषेतून तिरुक्कुरळाचा अभ्यास करतील आणि आपल्या महाविद्यालयांत व विद्यापीठांत परतल्यानंतर इतर विद्यार्थ्यांपर्यंतही त्यातील विचार पोहोचवतील.

तिरुक्कुरळामध्ये कोणत्याही विशिष्ट धर्माचा, राजाचा किंवा देशाचा नामोल्लेख केलेला नाही. त्यामुळेच सर्वजण या ग्रंथाला आपला मानतात आणि त्याचा अभिमान बाळगतात. सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ क्लासिकल तमिळने हा ग्रंथ ३५ भाषांमध्ये अनुवादित करून प्रकाशित केला आहे. तसेच, भारतीय संविधानाच्या आठव्या अनुसूचीत समाविष्ट असलेल्या २२ भाषांमध्ये तो आपल्या बहुभाषिक ॲप्प द्वारे उपलब्ध करून दिला आहे. यामुळे काश्मीरमधील एखादा विद्यार्थी आणि कन्याकुमारीमधील एखादा विद्यार्थी एकाच दिवशी, आपापल्या मातृभाषेतून एकाच कुरळाचा अभ्यास करू शकतात. अशा प्रकारे तिरुक्कुरळ संपूर्ण भारतातील विद्यार्थ्यांना एका समान ज्ञानपरंपरेच्या धाग्याने जोडतो.

# प्रकरण 2 – संत तिरुवल्लुवर यांचे जीवनचरित्र

तिरुवल्लुवरांविषयी आपल्याला खात्रीपूर्वक माहीत असलेली एकच गोष्ट म्हणजे त्यांनी रचलेले १,३३० कुरळ. त्यांच्या जन्माविषयी, कुटुंबाविषयी आणि व्यवसायाविषयी उपलब्ध असलेल्या बहुतेक कथा या नंतरच्या काळात प्रचलित झालेल्या पारंपरिक आख्यायिका आहेत. असे असले, तरी त्यांनी रचलेला तिरुक्कुरळ हा ग्रंथ त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची आणि विचारांची स्पष्ट ओळख करून देतो.

## नाव आणि विशेष उपाधी

'वळ्ळुवन' या नावापुढे 'तिरु' हे आदरदर्शक विशेषण जोडले गेले आणि त्यातून 'तिरुवल्लुवर' हे नाव रूढ झाले. परंपरेने त्यांना अनेक सन्मानार्थी नावे दिली आहेत: नायनार, देवर, दैवपुलवर, मुदर्पावलर, नान्मुगनार, मादानुपंगी, सेन्नाप्पोदार, पेरुनावलर आणि पोय्यिल पुलवर. ही नावे तिरुवल्लुवरांविषयी तमिळ समाजाच्या मनात असलेला आदर आणि त्यांच्या साहित्यिक योगदानाविषयीची कृतज्ञता दर्शवितात.

## कालखंड : विद्वानांची मते

तिरुक्कुरळाचा रचनाकाल इ.स.पूर्व ३०० ते इ.स.च्या पाचव्या शतकापर्यंत वेगवेगळया प्रकारे निश्चित केला जातो. झेक विद्वान कामिल झ्वेलेबिल यांनी तिरुक्कुरळाचा काळ इ.स. ४५०–५०० असा मानला आहे. 'एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका'मध्ये त्याचा काळ सहावे शतक असा दिला आहे, तर काही विद्वान तो इ.स.पूर्व पहिल्या शतकातील ग्रंथ मानतात. तमिळ परंपरेनुसार, तिरुवल्लुवरांचा काळ इ.स.पूर्व ३१ हा मानला जातो. मरैमलै अडिगळ यांनी मांडलेल्या या कालगणनेच्या आधारावर तमिळनाडू सरकारने १९७१ मध्ये राजपत्रात 'तिरुवल्लुवर वर्ष' ही कालगणना प्रसिद्ध केली. १९७२ पासून ती प्रचलित झाली. तिरुवल्लुवर वर्ष = इ.स.चे वर्ष + ३१. त्यानुसार, जानेवारी २०२६ पासून सुरू होणारे तिरुवल्लुवर वर्ष २०५७ आहे.

## पारंपरिक आख्यायिका

नंतरच्या काळातील स्वतंत्र काव्यरचना आणि मौखिक परंपरांमधून तिरुवल्लुवरांविषयी काही कथा सांगितल्या जातात. या कथांना ऐतिहासिक पुरावे उपलब्ध नाहीत. तरीही, लोकांच्या मनात तिरुवल्लुवरांचे व्यक्तिमत्त्व कशा स्वरूपात जिवंत आहे, हे या कथांमधून समजते.

- तिरुवल्लुवरांचा जन्म चेन्नईतील मायलापूर येथे झाला, अशी एक प्रचलित आख्यायिका आहे. तेथे त्यांचे स्वतंत्र मंदिरही आहे.
- तिरुवल्लुवर विणकामाचा व्यवसाय करीत असत आणि त्यांच्या पत्नीचे नाव वासुकी होते, असे परंपरेत सांगितले जाते. पतीने हाक मारताच विहिरीतून पाणी काढण्यासाठी वापरत असलेली दोरी तशीच सोडून वासुकी त्यांच्याकडे आल्या, अशी एक कथा आहे. पती-पत्नीमधील प्रेम आणि समर्पण यांचे उदाहरण म्हणून ही कथा सांगितली जाते.
- मदुराई येथील तमिळ संगमात तिरुक्कुरळ ग्रंथाचे सादरीकरण करण्यात आले, तेव्हा संगमाच्या आसनावर केवळ तिरुक्कुरळालाच स्थान मिळाले, अशीही एक आख्यायिका प्रचलित आहे.
- तिरुक्कुरळाची स्तुती करणाऱ्या पंचावन्न वेण्बा छंदातील पद्यांचा संग्रह म्हणजे 'तिरुवल्लुवमालै' होय. या संग्रहात इडैक्काडर म्हणतात, "मोहरीला छेद देऊन त्यात सात समुद्र सामावून ठेवले." अव्वैयार यांनी ही कल्पना अधिक सूक्ष्मपणे मांडली आहे. त्या म्हणतात, "अणूला छेद देऊन त्यात सात समुद्र सामावून,

त्याहूनही संक्षिप्त केलेला ग्रंथ म्हणजे तिरुक्कुरळ." या काव्यपंक्तींमधून तिरुक्कुरळाच्या अफाट आशयाची आणि विलक्षण संक्षिप्ततेची महती अधोरेखित होते.

## ग्रंथातून दिसणारे लेखकाचे व्यक्तिमत्त्व

तिरुवल्लुवरांना, धर्म, राज्यकारभार, अर्थशास्त्र, युद्धनीती, वैद्यकशास्त्र आणि प्रेम अशा जीवनाच्या सर्वच क्षेत्रांचे सखोल ज्ञान होते. ते माणसाचे मूल्यमापन त्याच्या जन्मावरून नव्हे, तर त्याच्या कर्मावरून करतात. म्हणूनच जैन, बौद्ध, शैव आणि वैष्णव अशा विविध धार्मिक परंपरांतील लोक तिरुवल्लुवरांना आपले मानतात आणि त्यांचा गौरव करतात. विविध परंपरांनी त्यांना आपलेसे मानणे, हे त्यांच्या विचारांच्या सर्वसमावेशकतेचे उत्तम प्रमाण आहे. अभिजात साहित्याचे अभ्यासक तिरुवल्लुवरांना भारताच्या सर्वमान्य नीतिपरंपरेचा एक महत्त्वपूर्ण स्वर मानतात.

## स्मारके

- **तिरुवल्लुवर दिवस** : तै महिन्याच्या दुसऱ्या दिवशी, म्हणजेच पोंगल सणाच्या काळात, तिरुवल्लुवर दिवस साजरा केला जातो.
- **वल्लुवर कोट्टम, चेन्नई:** एप्रिल १९७६ मध्ये भारताचे तत्कालीन राष्ट्रपती फक्रुद्दीन अली अहमद यांच्या हस्ते या स्मारकाचे उद्घाटन करण्यात आले. याची रचना वै.गणपती स्थपती यांनी केली. येथे तिरुक्कुरळातील सर्व १,३३० कुरळ शिलांवर कोरलेले आहेत. सुमारे ८० कोटी रुपये खर्चून या स्मारकाचे नूतनीकरण करण्यात आले आणि २१ जून २०२५ रोजी ते पुन्हा जनतेसाठी खुले करण्यात आले.
- **तिरुवल्लुवरांचा पुतळा:** कन्याकुमारी येथे तिरुवल्लुवरांचा १३३ फूट उंच पुतळा उभारण्यात आला आहे. तिरुक्कुरळातील १३३ अधिकारांचे प्रतीक म्हणून पुतळ्याची उंची १३३ फूट ठेवण्यात आली आहे. त्याचा ३८ फूट उंच चौथरा अऱत्तुप्पालमधील ३८ अध्यायांचे प्रतीक आहे, तर ९५ फूट उंच पुतळा पोरुट्पाल आणि इन्बत्तुप्पाळ या दोन भागांतील ९५ अध्यायांचे प्रतीक आहे. १ जानेवारी २००० रोजी या पुतळ्याचे उद्घाटन करण्यात आले. २००४ मध्ये आलेल्या त्सुनामीच्या प्रचंड लाटांनाही हा पुतळा तोंड देऊन उभा राहिला. या स्मारकाच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त ३० डिसेंबर २०२४ रोजी तिरुवल्लुवरांच्या पुतळ्याला विवेकानंद शिळेशी जोडणारा ७७ मीटर लांबीचा काचेचा पूल खुला करण्यात आला. या पुतळ्याला 'ज्ञानाचा पुतळा' असेही म्हटले जाते.

# प्रकरण 3 – तिरुक्कुरळची ग्रंथरचना आणि वैशिष्ट्ये

तिरुक्कुरळात एकूण १,३३० कुरळ आहेत. त्यांची प्रत्येकी दहा कुरळ असलेल्या १३३ अधिकारांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. हे अधिकार अऱम् (धर्म), पोरुळ (अर्थ) आणि इन्बम् (प्रेम) या तीन भागांत विभागलेले आहेत. तिरुक्कुरळातील प्रत्येक कुरळ हे केवळ दोन ओळींचे आणि सात सीर (छंदोघटक) असलेले कुरळ वेण्बा या तमिळ काव्यछंदातील पद्य आहे.

**त्रिपाल रचना (तीन भागांची विभागणी)**

| त्रिपाल रचना : १३३ अधिकार, १,३३० कुरळ (परिमेलळ्गर यांच्या टीकेवर आधारित अधिकारांची संख्या) | | |
|---|---|---|
| अऱत्तुप्पाल | पोरुट्पाल | कामत्तुप्पाल |
| 38 अध्याय (1-38)<br>380 कुरळ | 70 अध्याय (39-108)<br>700 कुरळ | 25 अध्याय (109-133)<br>250 कुरळ |
| प्रस्तावना<br>4 अध्याय<br>कुटुंब विज्ञान<br>20 अध्याय<br>संन्यासधर्म<br>13 अध्याय<br>नियति (दैव)<br>1 अध्याय | राजनीति<br>25 अध्याय<br>राजसी ज्ञान<br>32 अध्याय<br>सत्कुलाचे ज्ञान<br>13 अध्याय | मोहाच्या ज्ञान<br>7 अध्याय<br>विरहवेदनाच्या ज्ञान<br>18 अध्याय |

**अऱत्तुप्पाल – 38 अध्याय**

हा, **अऱत्तुप्पाल (सत्यज्ञानाज्ञ सर्ग)** भाग व्यक्तीच्या अंतर्मनातील जीवनासह कौटुंबिक जीवनाविषयी मार्गदर्शन करतो.

- प्रस्तावना **(1–4):** ईश्वरस्तुति, पर्जन्यस्तुति, निःसंगाचा मोठेपणा आणि सदाचार माहात्म्य. ईश्वरस्तुतिनंतर पावसासाठी स्वतंत्र अध्याय दिला आहे. यावरून सजीवांच्या जीवनाचा मूलभूत आधार निसर्गच आहे, ही तिरुवल्लुवरांची दृष्टी स्पष्ट होते.
- कुटुंब विज्ञान **(5–24):** कौटुंबिक जीवन, सद्गुणी भार्येचे गुण, संतती यांपासून सुरुवात करून प्रेम, अतिथिसत्कार, सौजन्य, कृतज्ञता, निःपक्षपातीपणा, आत्मसंय्यम, सामाजिक कर्तव्य आणि परोपकार,

उदारता आणि यश अशा विविध विषयांचा या भागात समावेश आहे. तिरुवल्लुवर गृहस्थाश्रमाला संन्यासाश्रमाइतकेच महत्त्व देतात; काही ठिकाणी तर ते गृहस्थजीवनाला संन्यासापेक्षाही श्रेष्ठ मानतात.

- संन्यासधर्म **(25–37):** दयाळूपणा, मांसाशन नको, सत्य, क्रोध राहित्य, वाईट न करणे/ अपाय न करणे, अहिंसा (न मारणे), अस्थिरता, संन्यास/ त्याग, सत्याचा साक्षात्कार आणि वासनाक्षय अशा विषयांचा या भागात समावेश आहे. जगभरातील विद्वानांना विशेष आकर्षित करणारे अहिंसेविषयीचे कुरळ याच विभागात (प्रकरण ८) आढळतात.
- नियति (दैव) **(38):** मानवी प्रयत्नांच्या पलीकडे असलेल्या कर्मफलाविषयीचा हा एकमेव अध्याय आहे.

**पोरुट्पाल् - 70 अध्याय**

**पोरुट्पाल् (धन संपत्तीचा सर्ग)** हा ग्रंथाचा निम्म्याहून अधिक भाग व्यापतो. यात राजनीति, प्रशासन, अर्थव्यवस्था, मैत्री आणि समाजजीवन यांविषयी विवेचन केले आहे.

**राजनीति (39–63):** राजाचे गुण,

- शिक्षा, ऐकणे आणि ज्ञान/ विवेक यांपासून सुरुवात करून न्यायी राज्य, हेरखाते, पुरुषार्थशाली उद्योग आणि खंबीरपणा अशा विविध विषयांचा या भागात समावेश आहे. राज्यकर्त्याचे वैयक्तिक गुण आणि न्यायाधिष्ठित शासनव्यवस्था हे या विभागाचे मुख्य केंद्रबिंदू आहेत.
- **राजसी ज्ञान (64–95):** मंत्री, वक्तृत्व, निश्चयी संकल्पशक्ती, दूत (वकील), देश, दुर्ग, किल्लेकोट / तटबंदी , द्रव्य मिळविणे, सैन्य, मैत्री, शत्रुत्व आणि औषधे अशा विषयांचा या विभागात समावेश आहे. राज्याच्या विविध घटकांचा येथे स्वतंत्रपणे विचार केला आहे.
- **सत्कुलाचे ज्ञान (96–108):** कुलीनता /खानदानीपणा, सन्मान /प्रतिष्ठा, सज्जनता, सभ्यता, कृषी; शेती, दारिद्र्य, भिक्षा आणि नीचपणा/ दुष्टपणा अशा विषयांचे विवेचन या विभागात केले आहे. येथे नागरिकांचे गुणधर्म आणि त्यांचे आचरण यांवर भर दिला आहे.

**कामत्तुप्पाल – 25 अध्याय**

**कामत्तुप्पाल (सुखाचा सर्ग)** हा संगमकालीन अगत्तिणै परंपरेवर आधारलेला प्रेमकाव्यात्मक संवाद आहे. यातील कुरळे नायक, नायिका आणि तिची सखी यांच्या संवादरूपात मांडलेली आहेत. तोल्काप्पियममधील ‘एखाद्या व्यक्तीचे (विशिष्ट व्यक्तीचे नाव) उघडपणे नाव घेऊ नये’ या नियमानुसार, येथे कोणत्याही व्यक्तीचे नाव दिलेले नाही. त्यामुळे या विभागातील प्रेमभावना केवळ एखाद्या व्यक्तीपुरती मर्यादित राहत नाही, तर ती सर्वांना लागू होणारी सार्वत्रिक मानवी भावना बनते.

- **मोहाच्या ज्ञान (109–115):** सुंदरीने हृदयास केलेली जखम आणि किंवदंती यांपासून अध्याय: विवाहपूर्व प्रेमजीवनाचे चित्रण..
- **विरहवेदनाच्या ज्ञान (116–133):** विरह वेदना पासून प्रेमकलहातील मधुरता पर्यंतचे अध्याय: विवाहबद्ध प्रेमिकांचा विरह, ओढ, प्रेमातील रुसवा आणि पुनर्मिलन यांचे भावपूर्ण चित्रण.

तिरुवल्लुवरांच्या मते, नीतीशिवाय संपत्ती, संपत्तीशिवाय गृहस्थजीवन आणि प्रेमाशिवाय सुख यांना पूर्णत्व प्राप्त होत नाही. तिरुक्कुरळात मानवी जीवनाची चार पुरुषार्थे — अऱम् (धर्म किंवा नीती), पोरुळ (अर्थ), इन्बम् (काम किंवा सुख) आणि वीडु (मोक्ष) — सांगितली आहेत. तिरुवल्लुवरांनी पहिल्या तीन पुरुषार्थांचे सविस्तर

विवेचन केले आहे. चौथ्या पुरुषार्थाचा, म्हणजेच मोक्षाचा, समावेश त्यांनी संन्यासधर्म आणि सत्याचे आकलन या अध्यायांमध्ये केला आहे. मानवी जीवनाच्या या सर्वसमावेशक चौकटीमुळेच भारताच्या कोणत्याही भागातील वाचकाला तिरुक्कुरळातील विचार सहज समजून घेता येतात आणि ते आपलेसे वाटतात.

## कुरळ वेण्बा छंद

- **ओळी:** दोन. पहिल्या ओळीत चार सीर आणि दुसऱ्या ओळीत तीन सीर असतात. अशा प्रकारे एका कुरळात एकूण सात सीर असतात.
- **तळै (छंदबंध):** वेण्तळै. शेवटचा सीर 'नाळ, मलर, कासु, पिरप्पु' या चार छंदप्रकारांपैकी एका प्रकाराने समाप्त होतो.
- **सीर विभागणी – कुरळ १:** *அகர* | *முதல* | *எழுத்தெல்லாம்* | *ஆதி*

  பகவன் | முதற்றே | உலகு.

कुरळाची ही संक्षिप्तताच त्याची खरी ताकद आहे. अव्वैयार यांनी त्याचे वर्णन 'अणूला छेद देऊन त्यात सात समुद्र सामावून ठेवल्याप्रमाणे' असे केले आहे. कुरळाचे हे छोटे आणि अर्थपूर्ण स्वरूप ते लक्षात ठेवण्यासाठी, विविध भाषांमध्ये अनुवादित करण्यासाठी आणि आजच्या काळात समाजमाध्यमांवर सामायिक करण्यासाठी अत्यंत अनुकूल आहे.

## तिरुक्कुरळाची विशेष नामे

तिरुक्कुरळाला मुप्पाल, उत्तरवेद, दैवनूल, पोय्यामोळी, वायुरै वाळत्तु आणि पोतुमरै अशी अनेक विशेष नामे आहेत. त्यांपैकी 'पोतुमरै' (सार्वत्रिक धर्मग्रंथ) हे नाव त्यातील आशयामुळे प्राप्त झाले आहे. फ्रेंच अनुवादक ए. एस. एरियल यांनी म्हटल्याप्रमाणे, तिरुवल्लुवर "जात, समाज किंवा श्रद्धा यांचा भेद न करता संपूर्ण मानवजातीशी संवाद साधतात." त्यामुळे तिरुक्कुरळ हा केवळ एका भाषा, समाज किंवा धर्मापुरता मर्यादित न राहता संपूर्ण मानवजातीसाठी मार्गदर्शक ठरणारा ग्रंथ आहे.

# प्रकरण 4 – टीकाकार आणि तिरुक्कुरळाच्या प्रकाशनाचा इतिहास

दहाव्या ते तेराव्या शतकादरम्यान तिरुक्कुरळावर धर्मर, मणक्कुडवर, तामत्तर, नच्चर, परिधियार, परिमेलळगर, तिरुमलैयर, मल्लर, परिप्पेरुमाळ आणि कालिंगर या दहा टीकाकारांनी टीका लिहिल्या. यांपैकी मणक्कुडवर, परिधियार, कालिंगर, परिप्पेरुमाळ आणि परिमेलळगर यांच्या टीका संपूर्ण स्वरूपात उपलब्ध आहेत. धर्मर, तामत्तर आणि नच्चर यांच्या टीका अंशतः उपलब्ध आहेत. मात्र, तिरुमलैयर आणि मल्लर यांच्या टीका सध्या उपलब्ध नाहीत. तिरुक्कुरळाचे जतन करून तो आजच्या पिढीपर्यंत पोहोचविण्यात टीकालेखनाच्या परंपरेने अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

## आधुनिक काळातील टीका

एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकांत कविराज पंडितर, उ. वे. स्वामिनाथ अय्यर, क. वडिवेलु चेट्टियार, अयोत्तिदासर, व. उ. चिदंबरनार, तिरु. वि. क., नामक्कल कवी आणि भारतीदासन यांच्यासह अनेक विद्वानांनी तिरुक्कुरळावर टीका लिहिल्या. सोप्या आणि स्पष्ट भाषेतील टीकालेखनाची परंपरा १९४९ मध्ये मु. वरदराजन यांच्या ‘तिरुक्कुरळ तळिवुरै’ या ग्रंथाने सुरू झाली. आजही तिरुक्कुरळावर नव्याने टीका लिहिण्याचे कार्य सुरू आहे.

## ताडपत्रांपासून मुद्रित ग्रंथापर्यंत

शतकानुशतके तिरुक्कुरळाची हस्तलिखिते ताडपत्रांवर उतरवून हा ग्रंथ जतन करण्यात आला. १८१२ मध्ये तंजावूर येथील ज्ञानप्रकाशर यांनी नालडियार आणि तिरुवल्लुवमालै यांच्यासह तिरुक्कुरळाची पहिली मुद्रित आवृत्ती प्रकाशित केली. तेव्हापासून आजपर्यंत या ग्रंथाच्या शेकडो आवृत्त्या प्रकाशित झाल्या आहेत.

## डिजिटल युग

आज तिरुक्कुरळाचा संपूर्ण ग्रंथ इंटरनेटवर आणि स्मार्टफोनवर उपलब्ध आहे. बहुभाषिक एप्स, ध्वनिग्रंथ आणि इतर आधुनिक डिजिटल माध्यमांमुळे तिरुक्कुरळाच्या अध्ययनाला नवे आयाम प्राप्त झाले आहेत.

# प्रकरण 5 – वान्मरै वल्लुवम्

இந்த இயல், திருக்குறளின் 108 அதிகாரங்களின் மையப்பொருண்மைகளைக் குறித்த அறிமுகமாக ஒன்று முதல் இருபத்துமூன்று தலைப்புகளில் அமைக்கப்பட்டிருக்கிறது.

## 5.1. तिरुक्कुरळातील प्रेम आणि सदाचार

जगातील सार्वत्रिक नीतिग्रंथ म्हणून गौरविल्या जाणाऱ्या तिरुक्कुरळात मानवी जीवनातील मूलभूत मूल्ये अत्यंत संक्षिप्त, तरीही सखोल स्वरूपात मांडली आहेत. माणसाने केवळ कसे जगावे, एवढेच नव्हे, तर कोणत्या मनोवृत्तीने जगावे, हेही तिरुवल्लुवर स्पष्ट करतात. या जीवनविषयक विचारांच्या केंद्रस्थानी प्रेम आणि सदाचार आहेत. तिरुक्कुरळात प्रेम हे सदाचाराचे प्राणतत्त्व म्हणून, तर सदाचार हा प्रेमाचा कृतीतून होणारा आविष्कार म्हणून प्रकट होतो.

### प्रेम – मानवी जीवनाचा पाया

तिरुवल्लुवर प्रेमाकडे केवळ एक भावना म्हणून पाहत नाहीत; तर माणसाला स्वार्थाच्या मर्यादेतून बाहेर काढून समाजहिताच्या दिशेने नेणारा एक मूलभूत सद्गुण म्हणून पाहतात.

அன்பிலார் எல்லாம் தமக்குரியர் அன்புடையார்

என்பும் உரியர் பிறர்க்கு. (குறள் 72)

अऩ्बिलार् ऎल्लाम् तमक्कुरियर् अऩ्बुडैयार्
ऎऩ्बुम् उरियर् पिऱर्क्कु. (कुरळ 72)

प्रेम न करणारा व्यक्ती सर्वस्व आपल्यापुरतेच ठेवतो
परंतू प्रेम करणारे दूसऱ्यासाठी सर्वस्व देऊन टाकतील.

प्रेम नसलेली व्यक्ती केवळ स्वतःचाच विचार करून जगते; परंतु प्रेमळ व्यक्ती इतरांसाठी स्वतःला समर्पित करण्याची मनोवृत्ती विकसित करते. अशा प्रकारे 'मी' या संकुचित भावनेचे रूपांतर 'आपण' या व्यापक भावनेत करणारी शक्ती म्हणजे प्रेम. कुटुंबात ते आपुलकीच्या रूपात, समाजात परस्परांविषयीच्या आस्थेच्या रूपात, तर संपूर्ण जगात मानवतेच्या रूपात विस्तारते.

அன்பின் வழியது உயிர்நிலை அஃதிலார்க்கு

என்புதோல் போர்த்த உடம்பு. (குறள் 80)

अऩ्बिऩ् वऴियदु उयिर्निलै अह्दिलार्क्कु
ऎऩ्बुतोल् पोर्त्त उडम्बु. (कुरळ 80)

ज्या व्यक्तीमध्ये प्रेम नाही त्याचे शरीर
हे हाडामांसाचा सांगाडा आहे.

केवळ शरीरात प्राण असणे म्हणजे जीवन नव्हे; इतर सजीवांचा आनंद आणि दुःख जाणून घेणारे संवेदनशील मन जेव्हा आपल्याजवळ असते, तेव्हाच जीवनाला खरा अर्थ प्राप्त होतो. म्हणूनच तिरुवल्लुवरांच्या दृष्टिकोनातून प्रेम हा केवळ मानवी स्वभावातील एक गुण नसून, मानवी जीवनाचा प्राण आहे.

**प्रेम आणि सदाचार**

प्रेम आणि सदाचार यांच्यातील अतूट नाते पुढील कुरळातून स्पष्ट होते.

*அன்பும் அறனும் உடைத்தாயின் இல்வாழ்க்கை*

*பண்பும் பயனும் அது.* (குறள் 45)

अऩ्बुम् अऱऩुम् उडैत्तायिऩ् इल्वाऴ्क्कै
पण्बुम् पयऩुम् अदु. (कुरळ 45)

ज्या घरात सदाचार आहे आणि भरपूर प्रेम
आहे, ते घर कृतार्थ झाले.

प्रेम आणि सदाचार यांनी युक्त असलेले गृहस्थजीवन हेच खऱ्या अर्थाने गुणसंपन्न आणि फलदायी जीवन होय.

गृहस्थजीवनाचे मोठेपण संपत्तीत किंवा सत्तेत नसते; ते प्रेम आणि सदाचाराने परिपूर्ण असलेल्या जीवनात असते. येथे प्रेम हे अंतःकरणातील सद्गुणाचे, तर सदाचार हा त्या सद्गुणाच्या कृतीतून प्रकट होणाऱ्या स्वरूपाचे प्रतीक आहे.

प्रेमळ व्यक्तीला इतरांचे नुकसान करावेसे वाटत नाही. दुसऱ्याचे दुःख स्वतःचे दुःख मानणाऱ्या व्यक्तीच्या मनात दानशीलता, अतिथिसत्कार, इतरांना दुःख न देणे, अहिंसा आणि करुणा यांसारखे सद्गुण स्वाभाविकपणे निर्माण होतात. म्हणूनच तिरुक्कुरळात सांगितलेला सदाचार हा बळजबरीने किंवा केवळ नियमांचे पालन करण्यासाठी आचरणात आणायचा नसतो; तो प्रेमातून सहजपणे उदयास येणारा जीवनमार्ग असतो. हीच गोष्ट तिरुवल्लुवर पुढील कुरळातून अधिक सखोलपणे स्पष्ट करतात.

*அறத்திற்கே அன்புசார்பு என்ப அறியார்*

*மறத்திற்கும் அஃதே துணை.* (குறள் 76)

अऱत्तिऱ्के अऩ्बुसार्बु ऎऩ्ब अऱियार्
मऱत्तिऱ्कुम् अःदे तुणै. (कुरळ 76)

अज्ञानी विचार करतात की प्रेम फक्त सत्कर्मासाठी आवश्यक आहे;
त्यांना हे माहित नाही की प्रेम हे शौऱ्यासाठी सहकारी आहे.

प्रेम हे केवळ सदाचारालाच आधार देते, असे काही जण मानतात; परंतु ते शौर्यालाही आधार देते, हे त्यांना माहीत नसते.

प्रेम हे केवळ कोमलतेचे लक्षण नाही; तर कर्तव्य पार पाडण्यासाठी, इतरांसाठी त्याग करण्यासाठी आणि न्यायाच्या बाजूने धैर्याने उभे राहण्यासाठी प्रेरणा देणारी 'अंतःकरणातील शक्ती' देखील आहे.

**सदाचार – मनाच्या निर्मळतेतून होणारी सुरुवात**

तिरुवल्लुवरांचा सदाचारविषयक विचार केवळ बाह्य कृतींपुरता मर्यादित नाही; तो माणसाच्या अंतर्मनाशी निगडित आहे. सदाचाराची सुरुवात मानवी मनापासूनच होते. म्हणूनच तिरुवल्लुवर म्हणतात,

*மனத்துக்கண் மாசிலன் ஆதல் அனைத்தறன்*

*ஆகுல நீர பிற.* (குறள் 34)

मऩत्तुक्कण् मासिलऩ् आदल् अऩैत्तऱऩ्
आहुल नीर पिऱ. (कुरळ 34)

मनाने शुद्ध रहा धर्म इतकाच आहे ज्यामध्ये सारा सदाचार सामावलेला
बाकी गोष्टी म्हणजे दंभ होय.

मन निष्कलंक असणे हाच सर्व सदाचारांचा पाया आहे; बाकी सर्व केवळ दिखावा आहे.

अशा प्रकारे तिरुवल्लुवर स्पष्ट करतात की मनाची निर्मळता हाच सदाचाराचा मूलभूत आधार आहे. एखादी कृती वरकरणी चांगली वाटली, तरी तिच्यामागे कपट, मत्सर, लोभ किंवा कीर्तीची हाव असेल, तर तिचे नैतिक मूल्य कमी होते. त्यामुळे सदाचार म्हणजे केवळ माणूस काय करतो, एवढेच नव्हे; तर तो ते कार्य कोणत्या हेतूने करतो, हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

### सदाचाराचे श्रेष्ठत्व,

*அறத்தினூஉங்கு ஆக்கமும் இல்லை அதனை*
*மறத்தலின் ஊங்கில்லை கேடு.* (குறள் 32)
अऱत्तिऩूउङ्गु आक्कमुम् इल्लै अदऩै
मऱत्तलिऩ् ऊङ्गिल्लै केडु. (कुरळ 32)

सदाचाराहून अधिक हितकारक दूसरे काही नाही
सदाचार त्याग करण्यासारखे हानिकारक दूसरे काही नाही.

असे तिरुवल्लुवर ठामपणे सांगतात. संपत्ती आणि सत्ता या अस्थिर आहेत; परंतु सदाचारामुळे मिळणारा मानवी सन्मान चिरस्थायी असतो. म्हणूनच तिरुवल्लुवर सदाचाराला मानवी जीवनातील सर्वोच्च संपत्ती मानतात.

### प्रेमापासून करुणेकडे

तिरुक्कुरळातील प्रेम केवळ कुटुंबापुरते किंवा नातेवाईकांपुरते मर्यादित राहत नाही. ते इतर माणसांपलीकडे जाऊन सर्व सजीवांना कवेत घेते, तेव्हा त्याला करुणा हे उच्च स्वरूप प्राप्त होते.

*அருட்செல்வம் செல்வத்துள் செல்வம் பொருட்செல்வம்*
*பூரியார் கண்ணும் உள.* (குறள் 241)

अरुट्चेल्वम् सॊल्वत्तुळ् सॊल्वम् पॊरुट्चॆल्वम्
पूरियार् कण्णुम् उळ. (कुरळ 241)

केवळ वस्तुसंपत्ती कधी सुख नाही देत,
तरी दयापूर्ण हृदय हीच संपत्ती खरी संपत्ती आहे.

भौतिक संपत्तीपेक्षा इतर सजीवांचे दुःख जाणून घेणारी करुणेची संपत्ती श्रेष्ठ आहे. अशा प्रकारे तिरुक्कुरळातील प्रेमविचाराचा विस्तार पुढीलप्रमाणे होतो : वैयक्तिक प्रेम → कौटुंबिक प्रेम → सामाजिक प्रेम → सर्व सजीवांप्रती प्रेम. म्हणूनच तिरुवल्लुवर विचारतात,

*தன்னுயிர்க்கு இன்னாமை தானறிவான் என்கொலோ*
*மன்னுயிர்க்கு இன்னா செயல்.* (குறள் 318)

तन्नुयिर्क्कु इन्नामै तान्अरिवान् ऎन्कॊलो
मन्नुयिर्क्कु इन्ना सॆयल्. (कुरळ 318)

स्वतःच्या दुःखाचा जाणीव असतो, तो

स्वतःहून दुसऱ्यास कसे दुःख देईल ?

स्वतःला वेदना होतात, हे जाणणारा माणूस इतर सजीवांना त्याच वेदना कशा देऊ शकतो, असा हा प्रश्न आहे. या प्रश्नातून सदाचाराचा गहन पाया स्पष्ट होतो. स्वतःला दुसऱ्याच्या जागी ठेवून विचार करण्याची वृत्ती हीच खऱ्या सदाचाराची सुरुवात आहे.

**आजच्या जगासाठी संदेश**

विज्ञान, तंत्रज्ञान आणि अर्थव्यवस्था या क्षेत्रांत मानवी समाजाने मोठी प्रगती केली असली, तरी द्वेष, हिंसा, स्वार्थ आणि भेदभाव यांसारख्या समस्या आजही कायम आहेत. अशा परिस्थितीत तिरुक्कुरळातील प्रेम आणि सदाचार हे केवळ प्राचीन विचार न राहता, आजच्या जगासाठीही आवश्यक असलेली मानवतावादी जीवनमूल्ये ठरतात.

ज्ञान माणसाला सामर्थ्य देते; त्या सामर्थ्याचा उपयोग चांगल्या कार्यासाठी कसा करावा, याचे मार्गदर्शन सदाचार करतो. तंत्रज्ञान माणसांना एकमेकांशी जोडते; परंतु प्रेमच त्यांच्या अंतःकरणांना जोडते. कायदा चुकीच्या कृतींना प्रतिबंध करतो; तर सदाचार चुकीची कृती न करण्याची मनोवृत्ती निर्माण करतो.

तिरुक्कुरळात प्रेम आणि सदाचार ही दोन स्वतंत्र तत्त्वे नाहीत. प्रेम हे सदाचाराचे मूळ आहे, तर सदाचार हे प्रेमाचे फळ आहे. प्रेम माणसाला स्वार्थातून मुक्त करते; सदाचार त्याला सार्वजनिक हिताच्या दिशेने मार्गदर्शन करतो. प्रेमाचा विस्तार करुणेपर्यंत पोहोचतो, तेव्हा माणूस सर्व सजीवांना आपलेच मानून त्यांच्याकडे पाहू लागतो.

म्हणूनच, तिरुवल्लुवरांनी सांगितलेले सदाचारी जीवन हे भीतीपोटी पाळले जाणारे आचरण नव्हे; तर प्रेमातून सहजपणे फुलणारी एक उच्च जीवनपद्धती आहे. प्रेम माणसाला खऱ्या अर्थाने माणूस बनवते, तर सदाचार त्याला एक श्रेष्ठ माणूस बनवतो. या दोन्हींचा संगम होतो, तेव्हाच वैयक्तिक मनःशांती, कौटुंबिक कल्याण, सामाजिक एकोपा आणि जागतिक मानवतावाद फुलून येतात.

## 5.2. तिरुक्कुरळातील अतिथी-सत्कार

तमिळ संस्कृतीच्या श्रेष्ठ वैशिष्ट्यांपैकी एक म्हणजे अतिथी-सत्कार. पाहुणा अनोळखी असला, तरी आपल्या घरी आलेल्या व्यक्तीचे हसतमुखाने स्वागत करणे, तिला भोजन देणे आणि प्रेमाने तिची काळजी घेणे, ही तमिळ लोकांची जीवनपद्धतीतील परंपरा आहे. तिरुवल्लुवर या परंपरेकडे केवळ एक सामाजिक प्रथा म्हणून पाहत नाहीत, तर तिला गृहस्थाश्रमातील मूलभूत सदाचाराचे स्थान देतात. तिरुक्कुरळात अतिथी-सत्कारासाठी स्वतंत्र अध्यायाची रचना करून, पाहुण्यांचे आदरातिथ्य करण्याचे महत्त्व ते स्पष्ट करतात.

**गृहस्थजीवनाचे सार्थक्य – अतिथी-सत्कार**

இருந்தோம்பி இல்வாழ்வது எல்லாம் விருந்தோம்பி
வேளாண்மை செய்தற் பொருட்டு. (குறள் 81)

इरुन्दोम्बि इल्वाऴ्वदु ऎल्लाम् विरुन्दोम्बि
वेळाण्मै सॆय्दऱ् पॊरुट्टु. (कुरळ 81)

घरातील धनसंपत्ती मिळवायची कशाला?
अतिथी सत्कार करण्यासाठीच सत्कर्मसाठी.

माणसाने संपत्ती मिळवून तिचे जतन करणे आणि कुटुंबाचा सांभाळ करणे, यामागचा उद्देश केवळ स्वतःचे आणि आपल्या कुटुंबाचे जीवन सुखकर बनवणे हा नसून, इतरांच्याही उपयोगी पडणे हा आहे, असे तिरुवल्लुवर सांगतात. येथे अतिथी-सत्कार म्हणजे केवळ भोजन देणे नव्हे, तर आपल्याजवळ जे काही आहे, ते इतरांबरोबर वाटून घेऊन जगण्याचा एक सामाजिक सदाचार आहे.

पाहुणे बाहेर असताना, ते अमृतासमान असले तरी ते एकट्याने खाणे योग्य नाही, असे तिरुवल्लुवर पुढील कुरळातून सांगतात :

விருந்து புறத்ததாத் தானுண்டல் சாவா
மருந்தெனினும் வேண்டற்பாற்று அன்று. (குறள் 82)

विरुन्दु पुऱत्तदात् तान्‌उण्डल् सावा
मरुन्देनिनुम् वेण्डऱ्पाऱ्‌ऱु अन्‌ऱु. (कुरळ 82)

अतिथीचा सत्कार न करता स्वतः अमृत प्यायचे
त्याचा काय फायदा तो अतिथीचा सत्कार नाही.

पाहुणे दाराबाहेर असताना, अमृतासमान अन्न असले तरी ते एकट्याने खाणे योग्य नाही.

आपल्याला मिळालेली संपत्ती केवळ स्वतःपुरतीच राखून ठेवणे, हा तिचा खरा उपयोग नव्हे, हाच या कुरळाचा अंतर्भूत अर्थ आहे.

**अन्नापेक्षाही श्रेष्ठ आहे चेहऱ्यावरील गोड हास्य**

अतिथी-सत्कारात केवळ भोजन महत्त्वाचे नसते; तर ते देण्यामागची मनोवृत्ती आणि चेहऱ्यावरील प्रसन्नताही तितकीच महत्त्वाची असते.

மோப்பக் குழையும் அனிச்சம் முகம்திரிந்து
நோக்கக் குழையும் விருந்து. (குறள் 90)

मोप्पक् कुऴैयुम् अनिच्चम् मुहम्तिरिन्दु
नोक्कक् कुऴैयुम् विरुंदु. (कुरळ 90)

सोनटक्क्याचे फूल वास घेण्याने, नाकाजवळ नेण्यानेच कोमेजून जाते;
परंतु अतिथीकडे नुसते पाहण्यानेही नाराजीने पाहिले तर त्याचे हृदय फुटून जाण्याचा संभव असतो.

वास घेताच कोमेजून जाणाऱ्या अनिच्छम फुलाप्रमाणे, पाहुण्यांचे स्वागत करताना चेहऱ्यावर नाराजी दिसली, तर त्यांचे मनही दुःखी होते, असे तिरुवल्लुवर सांगतात. एखाद्याला किती वस्तू दिल्या जातात, यापेक्षा “तुम्ही आमच्यासाठी महत्त्वाचे आहात” ही भावना पाहुण्यांच्या मनात निर्माण करणे, हाच खरा अतिथी-सत्कार आहे, हे ते अत्यंत सूक्ष्मपणे समजावून सांगतात.

**सामाजिक संबंधांचा पाया**

अतिथी-सत्कार माणसांमधील अंतर कमी करतो. अनोळखी व्यक्तीला आपलेसे करतो आणि व्यक्तीला समाजाशी जोडतो. त्यामुळे अतिथी-सत्काराकडे केवळ वैयक्तिक सद्‌गुण म्हणून नव्हे, तर सामाजिक एकोपा निर्माण करणारा गुण म्हणूनही पाहता येते. गृहस्थजीवनातील सर्वोत्तम कर्तव्य म्हणून अतिथी-सत्काराला गौरवाचे स्थान देण्यात आले आहे, हे पुढील कुरळातून स्पष्ट होते.

*பெறுமவற்றுள் யாமறிவது இல்லை அறிவறிந்த*

*மக்கட்பேறு அல்ல பிற. (குறள் 61)*

पॆऱुमवऱ्ऱुळ् यामऱिवदु इल्लै अऱिवऱिन्द
मक्कट्पेऱु अल्ल पिऱ. (कुरळ 61)

जगामध्ये मिळण्यासारख्या सर्व श्रेष्ठ गोष्टींमध्ये, सुजाण आणि ज्ञानवान संतती मिळण्यापेक्षा मोठी दुसरी कोणतीही संपत्ती किंवा सुख आमच्या दृष्टीने नाही.

गृहस्थजीवनातील सर्व प्रयत्नांचा उद्देश पाहुण्यांचे आदरातिथ्य करून त्यांची सेवा करणे हाच आहे.

आजच्या शहरीकरण झालेल्या आणि व्यक्तिकेंद्रित जीवनातही हा विचार तितकाच समर्पक आहे. अतिथी-सत्काराचे आधुनिक स्वरूप केवळ भोजन देण्यापुरते मर्यादित नाही; तर इतरांचा आदर करणे, नव्याने भेटणाऱ्या व्यक्तींना आपलेसे करणे आणि गरजू व्यक्तींच्या मदतीला धावून जाणे, यांचाही त्यात समावेश होतो.

तिरुक्कुरळात अतिथी-सत्कार म्हणजे केवळ भोजन देण्याची कृती नव्हे; तर आपल्या अंतःकरणातील प्रेम इतरांशी वाटून घेण्याचा सदाचार आहे. संपत्तीचे मोठेपण ती स्वतःजवळ बाळगण्यात नसून, ती इतरांबरोबर वाटून घेण्यात आहे. घराचे मोठेपण त्यातील सुखसोयींमध्ये नसून, तेथे येणाऱ्या व्यक्तीला मिळणाऱ्या प्रेमात आहे. म्हणूनच, अतिथी-सत्काराच्या माध्यमातून तिरुवल्लुवर "केवळ स्वतःसाठी जगण्यापेक्षा इतरांसाठीही जगणे, हेच श्रेष्ठ गृहस्थजीवन आहे" हा मानवतावादी विचार दृढपणे मांडतात.

## 5.3. तिरुक्कुरळातील जीवप्रेम (मानुसकी)

तिरुक्कुरळात माणसाला केंद्रस्थानी न ठेवता, सर्व सजीवांचा आदर करून जगावे, असा व्यापक सदाचारविषयक विचार मांडलेला आहे. दयाळूपणा, मांसाशन नको, अहिंसा (न मारणे) आणि इतरांना वाईट न करणे/ अपाय न करणे अशा अध्यायांमधून तिरुवल्लुवर सर्व सजीवांच्या जगण्याच्या अधिकारावर भर देतात.

**इतर सजीवांचे जीवन स्वतःच्या जीवनासमान मानणे**

*தன்னூன் பெருக்கற்குத் தான்பிறிது ஊன்உண்பான்*

*எங்ஙனம் ஆளும் அருள். (குறள் 251)*

तन्नून् पॆरुक्कऱ्कुत् तान्पिऱिदु ऊऩ्उण्बान्
ऎङ्ङऩम् आळुम् अरुळ्. (कुरळ 251)

स्वतःच्या शरीर पुष्टीकरणाकरिता म्हणून जो दुसऱ्या
प्राण्यांना खातो त्याला दया कशी बाळगू शकतो ?

स्वतःचे शरीर पुष्ट करण्यासाठी दुसऱ्या सजीवाला मारून त्याचे मांस खाणारा माणूस करुणाशील कसा असू शकतो, असा प्रश्न तिरुवल्लुवर विचारतात. आपल्या जीवनाप्रमाणेच आपण इतर सजीवांच्या जीवनाचाही आदर करतो का, असा मूलभूत नैतिक प्रश्न ते उपस्थित करतात. हा प्रश्न केवळ आहारपद्धतीपुरता मर्यादित नसून,

सर्व सजीवांच्या जीवनाविषयी आपण कोणती भूमिका घेतो, याचाही विचार करायला लावतो.

அருளல்லது யாதெனின் கொல்லாமை கோறல்

பொருளல்லது அவ்வூன் தினல். (குறள் 254)

अरुळल्लदु यादॆऩिऩ् कॊल्लामै कोऱल्
पॊरुळल्लदु अव्वूऩ् तिऩल्. (कुरळ 254)

जर दया म्हणजे कोणत्याही जीवाची हत्या न करणे तर प्राण्यांची हिंसा करणे खरोखर हृदयाचा निष्ठुरपणा आहे,आणि त्यांचे मांस खाणे म्हणजे तर फारच अन्याय वाटतो.

तिरुवल्लुवर प्राणिहत्येपासून दूर राहण्यालाच करुणेचा मूलभूत आधार मानतात.

**सर्व सजीवांप्रती प्रेमाची सर्वोच्च अवस्था**

इतर सजीवांना कोणतीही हानी न पोहोचवता जगणारी व्यक्तीच श्रेष्ठ आहे, हा विचार पुढील कुरळातून स्पष्ट होतो.

கொல்லான் புலாலை மறுத்தானைக் கைகூப்பி

எல்லா உயிரும் தொழும். (குறள் 260)

कॊल्लाऩ् पुलालै मऱुत्ताऩैक् कैकूप्पि
ऎल्ला उयिरुम् तॊऴुम्. (कुरळ 260)

जो कोणाची हिंसा करीत नाही व मांसाशन करीत नाही,
त्याला सारे प्राणी हात जोडून वंदन करतात.

केवळ इतर सजीवांच्या दुःखाबद्दल हळहळ व्यक्त करणे पुरेसे नाही, हे पुढील कुरळातून स्पष्ट होते.

உண்ணாமை வேண்டும் புலாஅல் பிறிதொன்றன்

புண்அது உணர்வார்ப் பெறின். (குறள் 257)

उण्णामै वेण्डुम् पुलाअल पिऱिदोऩ्ऱऩ्
पुण्अदु उणर्वार्प् पॆऱिऩ्. (कुरळ 257)

दूसऱ्या प्राण्यांच्या वेदनाची कल्पना जर मानवाला
यथार्थपणे आली, तर तो कधीही मांसाशन करणार नाही.

या विचारातून त्या सजीवाच्या वेदना मनापासून जाणून घेणे, हाच सर्व सजीवांप्रती प्रेमाचा खरा अर्थ आहे, असे तिरुवल्लुवर स्पष्ट करतात. इतरांना दुःख न पोहोचवणारी जीवनपद्धती निवडली पाहिजे, हाच या अध्यायातून मिळणारा गहन संदेश आहे.

आजच्या काळात या विचारांचा संबंध प्राणीसंरक्षण, जैवविविधता आणि पर्यावरणसंरक्षण यांसारख्या संकल्पनांशीही जोडता येतो. माणूस हा निसर्गावर राज्य करणारा नसून, निसर्गातील जीवनसाखळीचा एक भाग आहे, ही जाणीव तिरुवल्लुवरांच्या सर्व सजीवांप्रती असलेल्या प्रेमाच्या विचारातून निर्माण होते.

तिरुक्कुरळात सर्व सजीवांप्रती असलेले प्रेम हे माणसांवरील प्रेमाचेच विस्तारित रूप आहे. स्वतःच्या जीवाचा आदर करावा, त्याचप्रमाणे इतर सजीवांच्याही जीवनाचा आदर करावा, हाच तिरुक्कुरळाचा संदेश आहे. माणसाचे श्रेष्ठत्व त्याच्या सामर्थ्यात नसून, स्वतःपेक्षा दुर्बल असलेल्या सजीवांप्रती तो दाखवत असलेल्या करुणेत आहे. अशा प्रकारे, तिरुक्कुरळ सर्व सजीवांना सामावून घेणारा व्यापक सदाचारविचार मांडतो.

## 5.4. तिरुक्कुरळातील संन्यासधर्म

तिरुक्कुरळाच्या सदाचारविभागात गृहस्थजीवनानंतर संन्यासाश्रमी जीवनाशी संबंधित सदाचाराचे नियम मांडले आहेत. संन्यास म्हणजे केवळ शारीरिकरीत्या जगापासून दूर जाणे नव्हे; तर इच्छा, आसक्ती, क्रोध आणि अहंकार यांसारख्या मनावरील बंधनांवर विजय मिळवणे, असा सखोल अर्थही तिरुक्कुरळातील अनेक अध्यायांतून स्पष्ट होतो. परंपरागत टीकांमध्ये सदाचारविभागाचे गृहस्थजीवनविषयक विभाग आणि संन्यासजीवनविषयक विभाग असे दोन भाग केले आहेत.

**आसक्तीचा त्याग**

माणसाच्या अनेक दुःखांचे मूळ अतिआसक्तीत असते. संपत्ती, कीर्ती आणि सत्ता या जीवन जगण्यासाठीची साधने असावीत; त्यांनी माणसावरच नियंत्रण मिळवणाऱ्या शक्ती बनू नये. जीवनात या तत्त्वांचे आचरण करण्यासाठी ईश्वराची कृपा अत्यंत आवश्यक आहे. ही कृपा प्राप्त करण्यासाठी इतर आसक्तींचा त्याग करून ईश्वराच्या चरणांचा आश्रय घेतला पाहिजे.

*பற்றுக பற்றற்றான் பற்றினை அப்பற்றைப்*
*பற்றுக பற்று விடற்கு.* (குறள் 350)
पऱ्ऱुह पऱ्ऱऱ्ऱान् पऱ्ऱिनै अप्पऱ्ऱैप्
पऱ्ऱुह पऱ्ऱु विडऱ्कु. (कुरळ 350)

आसक्तीविहीन ईश्वराची आसक्ती करणाऱ्याला
संसार बंधनातुन मुक्ती मिळते.

खरा संन्यास वेशभूषेत किंवा बाह्य रूपात नसून अंतर्मनात असतो. इच्छांवर नियंत्रण न ठेवता केवळ बाहेरून संन्याशासारखे दिसण्यात काहीही अर्थ नाही. म्हणूनच, तिरुवल्लुवरांच्या मते, संन्यास म्हणजे स्वतःवर नियंत्रण मिळवण्यासाठी केलेली अंतर्मुख साधना होय.

**संन्यास आणि करुणा**

तिरुक्कुरळातील संन्यासविषयक विचार माणसाला समाजापासून दूर नेत नाहीत. उलट, दयाळूपणा, तपश्चर्या, सत्य, क्रोध राहित्य, वाईट न करणे/ अपाय न करणे आणि अहिंसा (न मारणे) अशा गुणांद्वारे माणसाला अधिक जबाबदार बनवतात.

स्वतःच्या इच्छांवर विजय मिळवणारा माणूस इतरांचे हक्क हिरावून घेत नाही; क्रोधावर विजय मिळवणारा इतरांना दुःख देत नाही; आणि अहंकारावर विजय मिळवणारा इतर सजीवांना तुच्छ लेखत नाही. म्हणूनच, संन्यास म्हणजे जगाचा द्वेष करणे नव्हे, तर स्वतःच्या मनातील अमर्याद इच्छांवर विजय मिळवणे होय. उपभोगवाद, स्पर्धा आणि संपत्तीचा हव्यास वाढलेल्या आजच्या जीवनात तिरुक्कुरळातील संन्यासविषयक विचारांना नवा अर्थ प्राप्त होतो. गरज आणि इच्छा यांतील फरक ओळखणे, मर्यादेत राहून जीवन जगणे, मनावर नियंत्रण ठेवणे आणि साधेपणा स्वीकारणे ही तत्त्वे आधुनिक जीवनातही अत्यंत आवश्यक आहेत.

तिरुक्कुरळाने सांगितलेला संन्यास म्हणजे जगापासून पळ काढणे नव्हे; तर जगात राहूनच स्वतःच्या मनावर विजय मिळवणे होय. संपत्तीचा त्याग करण्यापेक्षा तिच्याविषयीची आसक्ती सोडणे आणि इतरांवर विजय मिळवण्यापेक्षा स्वतःवर विजय मिळवणे, हाच श्रेष्ठ संन्यास आहे. अशा प्रकारे, संन्यास हा माणसाच्या अंतःकरणाच्या निर्मळतेचा आणि मानसिक मुक्तीचा मार्ग आहे, हे तिरुवल्लुवर आपल्या जीवनविषयक तत्त्वज्ञानातून स्पष्ट करतात.

## 5.5. तिरुक्कुरळातील व्यक्तिगत आचारसंहिता

चांगल्या समाजाचा पाया चांगली माणसे हाच असतो. केवळ कायद्यांच्या आधारे समाजात सुधारणा घडवून आणता येत नाही. प्रत्येक व्यक्तीमध्ये आत्मसंयम, प्रामाणिकपणा, जबाबदारीची जाणीव आणि विनयशीलता यांसारखे गुण रुजले पाहिजेत. तिरुक्कुरळ हा विचार वैयक्तिक चारित्र्य आणि आचरण या व्यापक जीवनदृष्टीतून मांडतो.

### सदाचरण हेच श्रेष्ठत्व

माणसाला श्रेष्ठत्व प्राप्त करून देणारी गोष्ट म्हणजे त्याची संपत्ती किंवा पद नव्हे, तर त्याचे सदाचरण होय. म्हणूनच सदाचरणाचे रक्षण प्राणांपेक्षाही अधिक जपून केले पाहिजे, हे तिरुवल्लुवर पुढील कुरळातून सांगतात :

ஒழுக்கம் விழுப்பம் தரலான் ஒழுக்கம்
உயிரினும் ஓம்பப் படும். (குறள் 131)

ऑऴुक्कम् विऴुप्पम् तरलान् ऑऴुक्कम्
उयिरिनुम् ओम्बप् पडुम्. (कुरळ 131)

चांगले वर्तन मनुष्याच्या जीवनात सर्वोच्च सन्मान आणि श्रेष्ठत्व मिळवून देतो, म्हणूनच सदाचाराचे रक्षण आपल्या प्राणांपेक्षाही अधिक महत्त्वाचे मानून केले पाहिजे.

सदाचरणामुळे श्रेष्ठत्व प्राप्त होते; म्हणून सदाचरणाचे रक्षण प्राणांपेक्षाही अधिक काळजीपूर्वक केले पाहिजे. ज्ञान आणि कौशल्य माणसाला प्रगतीच्या मार्गावर पुढे नेऊ शकतात; परंतु त्या प्रगतीला खरे मूल्य प्राप्त करून देणारे सदाचरणच असते. एखादी व्यक्ती ज्ञानी असूनही सदाचरणहीन असेल, तर तिचे ज्ञानसुद्धा समाजासाठी हानिकारक ठरू शकते.

### आत्मसंयम – सदाचरणाचा रक्षक

तिरुवल्लुवर आत्मसंयमाला वैयक्तिक सदाचरणाचा केंद्रबिंदू मानतात. विचार, वाणी आणि कृती यांवर नियंत्रण ठेवण्याची क्षमता म्हणजे आत्मसंयम होय. भावनांच्या आहारी तात्काळ न जाता, त्यांच्या परिणामांचा विचार करून कृती करणे, हे परिपक्व मनाचे लक्षण आहे. हा विचार पुढील कुरळातून स्पष्ट होतो :

அடக்கம் அமரருள் உய்க்கும் அடங்காமை
ஆரிருள் உய்த்து விடும். (குறள் 121)

अडक्कम् अमररुळ् उय्क्कुम् अडङ्गामै
आरिरुळ् उय्त्तु विडुम्. (कुरळ 121)

आत्तसय्यम स्वर्गाकडे नेतो तर सय्यम नसलेला मनुष्य अज्ञानचा व विनाशाच्या अंधकारात पडतो.आत्मसंयम माणसाला देवतांच्या स्थानापर्यंत उंचावतो; तर असंयम त्याला गहन अंधकारात ढकलतो.
त्याचप्रमाणे, एखाद्या व्यक्तीची वाणी हीदेखील तिच्या सदाचरणाची कसोटी ठरते.

*தீயினால் சுட்டபுண் உள்ளாறும் ஆறாதே*
*நாவினால் சுட்ட வடு.* (குறள் 129)
तीयिऩाल् सुट्टपुण् उळ्ळारुम् आऱादे
नाविऩाल् सुट्ट वडु. (कुरळ 129)

विस्तवाने भाजलेले बरे होते, परंतु जिभेने भाजल्यामुळे
झालेली मनाची जखम कधीही ठीक होत नाही, सुकत नाही.

या कुरळातून तिरुवल्लुवर एक सत्य स्पष्ट करतात : शरीरावर झालेली जखम कालांतराने बरी होऊ शकते; परंतु शब्दांमुळे झालेली मनाची जखम दीर्घकाळ टिकून राहते. म्हणूनच, वैयक्तिक सदाचरण म्हणजे केवळ कृतींवर नियंत्रण ठेवणे नव्हे, तर विचार, वाणी आणि भावना या सर्वांना योग्य दिशा देणे होय.

**व्यक्तीपासून समाजाकडे**

एखाद्या व्यक्तीने सदाचारी जीवन जगल्याचा लाभ केवळ तिलाच मिळत नाही. प्रामाणिक व्यक्तींमुळे चांगली कुटुंबे घडतात; चांगल्या कुटुंबांमुळे चांगला समाज निर्माण होतो; आणि चांगल्या समाजातून जबाबदार राष्ट्र घडते. म्हणूनच, सामाजिक परिवर्तनाची सुरुवात व्यक्तीपासूनच होते.

आजच्या इंटरनेट आणि समाजमाध्यमांच्या युगात वैयक्तिक सदाचरणाची व्याप्ती आणखी वाढली आहे. प्रत्यक्ष बोलण्यास संकोच वाटेल असे काही इंटरनेटवर न लिहिणे, चुकीची माहिती पसरवणे टाळणे आणि इतरांच्या खासगीपणाचा आदर करणे, हीदेखील आधुनिक सदाचरणाची रूपे आहेत.

तिरुक्कुरळात वैयक्तिक सदाचरण म्हणजे बाहेरून लादलेले बंधन नव्हे; तर स्वतःच्या वर्तनाला स्वतःच योग्य दिशा देणारे अंतर्गत नियंत्रण होय. आत्मसंयम, मधुर वाणी, प्रामाणिकपणा, सहनशीलता आणि विनयशीलता हे गुण माणसाचे खरे मूल्य ठरवतात. जग बदलण्यापूर्वी माणसाने स्वतःला सुधारले पाहिजे, हाच तिरुवल्लुवरांचा विचार आहे. वैयक्तिक सदाचरण हेच सामाजिक सदाचरणाचे पहिले बीज असल्यामुळे तिरुक्कुरळातील हा विचार सदैव प्रासंगिक ठरतो.

## 5.6. तिरुक्कुरळातील आत्मविश्वासाचे विचार

‘आत्मविश्वास’ हा शब्द तिरुवल्लुवरांनी थेट वापरलेला नसला, तरी उत्साह, मनोधैर्य, प्रयत्न, कार्यातील दृढनिश्चय आणि संकटांपुढे न डगमगणे अशा विषयांवरील अध्यायांत आत्मविश्वासाशी संबंधित विचार मांडले आहेत. माणसाचे यश आणि अपयश हे मोठ्या प्रमाणावर त्याच्या मनोबलावर आणि प्रयत्नांवर अवलंबून असते, अशी तिरुवल्लुवरांची धारणा आहे. म्हणूनच, माणसाचे श्रेष्ठत्व त्याच्या मनाच्या उंचीवर अवलंबून असते, हे ते पुढील कुरळातून स्पष्ट करतात :

*வெள்ளத் தனைய மலர்நீட்டம் மாந்தர்தம்*
*உள்ளத் தனையது உயர்வு.* (குறள் 595)
वॆळ्ळत् तऩैय मलर्नीट्टम् मान्दर्तम्
उळ्ळत् तऩैयदु उयर्वु. (कुरळ 595)

पाण्यात उगवणाऱ्या कमळाच्या दांड्याची लांबी ही पाण्याच्या खोलीवर अवलंबून असते. त्याचप्रमाणे माणसाची प्रगती आणि महानता ही त्याच्या मनातील उत्साहाच्या आणि विचारांच्या उंचीवर अवलंबून असते.

पाण्याच्या खोलीनुसार कमळाच्या देठाची उंची वाढते; त्याचप्रमाणे माणसाचे श्रेष्ठत्व त्याच्या मनाच्या उंचीवर अवलंबून असते.

ज्याप्रमाणे पाण्याच्या खोलीनुसार कमळाचा देठ उंच वाढतो, त्याचप्रमाणे माणसाचे श्रेष्ठत्व त्याच्या मनाच्या उंचीवर अवलंबून असते. उच्च ध्येय आणि आत्मविश्वास हे मानवी प्रगतीचे प्रारंभबिंदू आहेत, हा संदेश या कुरळातून मिळतो.

## मनोधैर्य आणि यश

जीवनात ध्येय साध्य करण्यासाठी केवळ उद्दिष्ट निश्चित करणे पुरेसे नसते; ते गाठण्यासाठी मनोधैर्यही आवश्यक असते. विचार आणि कृती यांचा समन्वय साधला जातो, तेव्हाच यश प्राप्त होते. हा विचार स्पष्ट करताना तिरुवल्लुवर म्हणतात :

*எண்ணிய எண்ணியாங்கு எய்துப எண்ணியார்*
*திண்ணியர் ஆகப் பெறின்.* (குறள் 666)

ऎण्णिय ऎण्णियाङ्गु ऎय्दुब ऎण्णियार्
तिण्णियर् आहप् पॆऱिऩ्. (कुरळ 666)

इच्छेनुसार तुम्हाला सर्व काही मिळेल; परंतु सर्व इच्छाशक्ती कार्यात हवी,
सर्व निश्चयी संकल्पशक्ती आपल्या कार्यात हवी.

ध्येय निश्चित करणारे लोक मनाने दृढ असतील, तर त्यांनी ठरवलेली उद्दिष्टे त्यांना अपेक्षेप्रमाणे साध्य करता येतात. अपयशामुळे मन खचू न देता सातत्याने प्रयत्न करत राहण्याचे महत्त्वही तिरुवल्लुवर अधोरेखित करतात.

*துன்பம் உறவரினும் செய்க துணிவாற்றி*
*இன்பம் பயக்கும் வினை.* (குறள் 669)

तुऩ्बम् उऱवरिऩुम् सॆय्ह तुणिवाऱ्ऱि
इऩ्बम् पयक्कुम् विऩै. (कुरळ 669)

ज्यांमुळे सुखाची वृद्धी होईल ती कर्मे कर. ती सिद्धीस नेण्यासाठी मन
वज्राप्रमाणे कठोर नि खंबीर करून प्रयत्न कर. कारण शेवटी ती कर्मे आनंददायक असतील.

हाती घेतलेल्या कार्यात कितीही अडथळे आले, तरी ते कार्य अर्धवट न सोडता सातत्याने प्रयत्न करत राहून यश मिळवले पाहिजे. आत्मविश्वास म्हणजे केवळ अडथळ्यांचा विचार न करणे नव्हे; तर अडथळे असले, तरी त्यांवर मात करता येते, असा दृढ विश्वास मनात बाळगणे होय.

## प्रयत्नाचे महत्त्व

दैवाच्या अनुकूलतेमुळे एखाद्या कार्यात यश मिळाले नाही, तरी ते कार्य साध्य करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचे फळ मिळू शकते, असे तिरुवल्लुवर सांगतात.

*தெய்வத்தான் ஆகா தெனினும் முயற்சிதன்*
*மெய்வருத்தக் கூலி தரும்.* (குறள் 619)

दॆय्वत्ताऩ् आहा दॆऩिऩुम् मुयऱ्चितऩ्
मॆय्वरुत्तक् कूलि तरुम्. (कुरळ 619)

नशिबाच्या खेळामुळे एखादे काम देवाकडूनही पूर्ण होऊ शकले नाही तरी उद्योगदेवता

तुझ्या श्रमाचे फळ तुला दिल्यावाचून राहणार नाही.

अपेक्षित संपूर्ण यश मिळाले नाही, तरी प्रामाणिक प्रयत्न कधीही वाया जात नाहीत, हा विचार या कुरळातून व्यक्त होतो. त्यामुळे आत्मविश्वास म्हणजे केवळ सकारात्मक विचार नव्हे; तर प्रयत्नांशी जोडलेला कृतीवरील विश्वास होय.

तिरुक्कुरळाच्या दृष्टिकोनातून आत्मविश्वास म्हणजे अहंकार नव्हे; तर स्वतःच्या क्षमतेची जाणीव ठेवून, ध्येय स्पष्ट करून आणि अविरत प्रयत्न करत राहण्याची मनाची दृढता होय. “मला जमेल” हा विचार आणि “मी प्रयत्न करीन” ही कृती यांची सांगड घातली जाते, तेव्हाच माणसाच्या क्षमतेला पूर्णत्व प्राप्त होते.

## 5.7. तिरुक्कुरळातील शिक्षण

तिरुवल्लुवर शिक्षणाकडे केवळ ज्ञानसंचय म्हणून पाहत नाहीत. शिक्षणामुळे माणसाची विचारदृष्टी व्यापक झाली पाहिजे, त्याच्या आचरणात सुधारणा झाली पाहिजे आणि ते आयुष्यभर त्याला मार्गदर्शन करणारी संपत्ती ठरले पाहिजे, असे ते सांगतात.

*கற்க கசடறக் கற்பவை கற்றபின்*
*நிற்க அதற்குத் தக.* (குறள் 391)
कऱ्क कसडऱक् कऱ्पवै कऱ्ऱपिऩ्
निऱ्क अदऱ्कुत् तह. (कुरळ 391)

शिका जे शिकायचे आहे आणि दोषरहित शिका; एकदा शिकलात तर त्याचे आचरण करा.

जे शिकणे आवश्यक आहे, ते कोणत्याही त्रुटीविना पूर्णपणे शिकावे; आणि शिकल्यानंतर त्यानुसार आचरण करावे. जे शिकणे आवश्यक आहे, ते नीट समजून शिकावे आणि शिकलेल्या ज्ञानानुसार जीवन जगावे, ही तिरुवल्लुवरांनी सांगितलेली शिक्षणाची पद्धत आहे. शिक्षण म्हणजे केवळ माहिती लक्षात ठेवणे नव्हे. एखादी गोष्ट स्पष्टपणे समजून घेणे आणि शिकलेल्या तत्त्वांनुसार जीवन जगणे, हेच खरे शिक्षण होय.

### शिक्षण – माणसाचे डोळे

शिक्षण हे डोळयांसारखे आहे. असे शिक्षण प्राप्त करणे, हेच मानवी जीवनाचे ध्येय असले पाहिजे, असे तिरुवल्लुवर सांगतात.

*எண்ணென்ப ஏனை எழுத்தென்ப இவ்விரண்டும்*
*கண்ணென்ப வாழும் உயிர்க்கு.* (குறள் 392)

ऎण्णॆऩ्ब एऩै ऎऴुत्तॆऩ्ब इव्विरण्डुम्
कण्णॆऩ्ब वाऴुम् उयिर्क्कु. (कुरळ 392)

संख्या आणि अक्षरे, गणित आणि भाषा या दोन्ही जसे मानव जीवनाचे डोळे आहेत.

अंकज्ञान आणि अक्षरज्ञान या दोन्ही गोष्टी जगणाऱ्या माणसाचे डोळे आहेत.

अंकज्ञान आणि अक्षरज्ञान यांना मानवी जीवनाचे डोळे म्हटले आहे. डोळे जगाचे बाह्य स्वरूप दाखवतात; तर शिक्षण त्या जगाचा अर्थ समजून घेण्यास मदत करते.

*கண்ணுடையர் என்பவர் கற்றோர் முகத்திரண்டு*
*புண்ணுடையர் கல்லா தவர்.* (குறள் 393)

कण्णुडैयर् ऎन्बवर् कऱ्ऱोर् मुहत्तिरण्डु
पुण्णुडैयर् कल्ला दवर्. (कुरळ 393)

सुशिक्षित पंडितांनाच खऱ्या अर्थाने डोळे आहेत असे म्हटले जाते; अशिक्षित लोकांच्या चेहऱ्यावर असलेले दोन डोळे नसून केवळ दोन जखमा आहेत.

शिकलेले लोकच खऱ्या अर्थाने डोळे असलेले आहेत; न शिकलेल्यांच्या चेहऱ्यावर दोन डोळे असूनही ते जणू जखमा आहेत.

शिक्षण घेतलेले लोकच खऱ्या अर्थाने दृष्टी असलेले आहेत; अशिक्षित व्यक्तींना डोळे असूनही ते निरुपयोगी जखमांसारखे आहेत, असे तिरुवल्लुवर सांगतात. यातून शिक्षण म्हणजे केवळ पाहण्याची क्षमता नव्हे, तर योग्य-अयोग्य यांचा विवेक करून जगाकडे पाहण्याची दृष्टी होय, हा विचार स्पष्ट होतो.

**अविनाशी संपत्ती**

भौतिक संपत्ती नष्ट होऊ शकते; परंतु शिक्षणामुळे प्राप्त झालेले ज्ञान माणसाच्या विचारांत आणि व्यक्तिमत्त्वात कायमस्वरूपी टिकून राहते. म्हणूनच तिरुवल्लुवर शिक्षणाला अविनाशी संपत्ती मानतात. हा विचार त्यांनी पुढील कुरळातून स्पष्ट केला आहे.

கேடில் விழுச்செல்வம் கல்வி ஒருவற்கு
மாடுஅல்ல மற்றை யவை. (குறள் 400)
केडिल् विऴुच्चॆल्वम् कल्वि ऒरुवऱ्कु
माडुअल्ल मऱ्ऱै यवै. (कुरळ 400)

खरा न्याय आणि निर्दोश असा ठेवा जर कोणता असेल तर तो
ज्ञानाचा होय; त्याच्यापुढे बाकी सारी संपत्ती तुच्छ आहे.

शिक्षण ही माणसासाठी नष्ट न होणारी श्रेष्ठ संपत्ती आहे; इतर कोणतीही संपत्ती तिच्या तुलनेत खरी संपत्ती ठरत नाही.

तिरुक्कुरळात शिक्षण म्हणजे ज्ञान, सदाचरण आणि व्यवहार यांचा समन्वय होय. शिकलेली व्यक्ती केवळ ज्ञानी असून चालत नाही, तर तिने शिकलेल्या ज्ञानानुसार आचरणही केले पाहिजे. ज्ञानाचे रूपांतर प्रत्यक्ष जीवनात करण्यातच शिक्षणाचे खरे सार्थक्य आहे.

## 5.8. तिरुक्कुरळातील नेतृत्वगुण

तिरुक्कुरळाच्या अर्थविभागात राजा, मंत्री, किल्ला, सैन्य, प्रजाजन, सल्लामसलत, योग्य वेळेची जाणीव आणि विचारपूर्वक कार्य करण्याची पद्धत अशा विविध विषयांवरील विचार मांडले आहेत. या विचारांकडे नेतृत्वगुणांच्या मूलभूत तत्त्वांनुसारही पाहता येते.

தூங்காமை கல்வி துணிவுடைமை இம்மூன்றும்
நீங்கா நிலனாள் பவற்கு. (குறள் 383)
तूङ्गामै कल्वि तुणिवुडैमै इम्मून्ऱुम्
नीङ्गा निलऩाळ् बवऱ्कु. (कुरळ 383)

जे पृथ्वीवर सत्ता गाजवितात, त्यांच्याजवळ पुढील तीन गुण असतातः

1 सदैव सज्जता, 2 विद्या, 3 धाडस.

सतर्कता, ज्ञान आणि धैर्य हे तीन गुण राज्यकारभार करणाऱ्या व्यक्तीमध्ये सदैव असले पाहिजेत.

सतर्कता, ज्ञान आणि धैर्य हे तिरुवल्लुवर एका नेत्याचे मूलभूत गुण म्हणून सांगतात.

**नेतृत्वगुण**

जो नेता सहजपणे भेटू शकतो आणि सर्वांशी प्रेमाने वागतो, त्याचे नेतृत्व सर्व लोकांना आवडते, हे तिरुवल्लुवर पुढील कुरळातून सांगतात :

*காட்சிக்கு எளியன் கடுஞ்சொல்லன் அல்லனேல்*
*மீக்கூறும் மன்னன் நிலம்.* (குறள் 386)

काट्चिक्कु ऎळियन् कडुञ्जॊल्लन् अल्लऩेल्
मीक्कूऱुम् मन्ऩन् निलम्. (कुरळ 386)

ज्या राजाजवळ प्रजेला जाता येते, जो सर्वानां प्राप्य आहे, जो गोड बोलतो, त्या राजाच्या राज्याची इतर राज्यांपेक्षा सर्वत्र अधिक प्रशंसा होईल.

जो राजा लोकांना सहज भेटणारा असतो आणि कठोर शब्द बोलत नाही, त्याच्या राज्याची सर्वत्र प्रशंसा होते.

तिरुक्कुरळात निर्भयता, गरजू आणि दुर्बलांना उदारपणे मदत करणे, ज्ञान आणि उत्साह हे चार गुण नेत्यासाठी आवश्यक असल्याचे सांगितले आहे.

**नेतृत्वाची तत्त्वे**

*முறைசெய்து காப்பாற்றும் மன்னவன் மக்கட்கு*
*இறையென்று வைக்கப் படும்.* (குறள் 388)

मुऱैसॆय्दु काप्पाऱ्ऱुम् मन्ऩवन् मक्कट्कु
इऱैयॆऩ्ऱु वैक्कप् पडुम्. (कुरळ 388)

जो निःपक्षपाती न्याय देतो आणि प्रजापालन काळजीपूर्वक करतो, तो नरश्रेष्ठ म्हणून मानला जाईल, तो देवमाणूस होईल.

जो राजा न्यायाने राज्यकारभार करतो आणि आपल्या प्रजेचे रक्षण करतो, त्याला प्रजा देवासमान मानते. आपल्यावर विश्वास ठेवणाऱ्या लोकांच्या गरजा पूर्ण करून त्यांचे रक्षण करण्याची क्षमता नेत्यामध्ये असली पाहिजे, हे तिरुक्कुरळाने सांगितलेल्या नेतृत्वाच्या तत्त्वाचे सार आहे. यातून नेतृत्व म्हणजे अधिकार गाजवण्याचा हक्क नव्हे, तर जबाबदारी पार पाडण्याचे कर्तव्य होय, हे स्पष्ट होते. एका उत्तम नेत्याने इतरांचे सल्ले ऐकले पाहिजेत आणि आपल्या चुका दाखवून देणाऱ्यांचे म्हणणेही स्वीकारले पाहिजे.

तिरुक्कुरळातील नेतृत्वविषयक विचारांमध्ये ज्ञान, धैर्य, न्याय, विचारविनिमय, जबाबदारी आणि लोककल्याण या गुणांचा समन्वय आहे. खरा नेता केवळ स्वतः पुढे चालणारा नसतो, तर सर्वांना प्रगतीच्या दिशेने घेऊन जाणारा असतो.

## 5.9. तिरुक्कुरळातील शारीरिक आरोग्य

तिरुक्कुरळातील औषधविषयक अध्याय केवळ आजार झाल्यानंतर उपचार घेण्याविषयी सांगत नाही, तर आजार होऊ नयेत यासाठी कोणती जीवनपद्धती अवलंबावी, हेही स्पष्ट करतो. विशेषतः आहारविषयक शिस्तीला तिरुवल्लुवरांनी दिलेले महत्त्व उल्लेखनीय आहे.

*மருந்தென வேண்டாவாம் யாக்கைக்கு அருந்தியது*
*அற்றது போற்றி உணின்.* (குறள் 942)
मरुन्दॆऩ वेण्डावाम् याक्कैक्कु अरुन्दियदु
अऱ्ऱदु पोऱ्ऱि उणिऩ्. (कुरळ 942)

शरीराला औषधाची गरज नसते,
जर आधीचे सेवन पचले असेल याची खात्री केल्यानंतर कोणी खाल्ले तर.

आधी खाल्लेले अन्न पूर्णपणे पचल्याची खात्री करून, योग्य प्रमाणात भोजन केले, तर शरीराला औषधांची गरज भासणार नाही.

आधी खाल्लेले अन्न पचल्यानंतर, योग्य प्रमाणात आहार घेतल्यास शरीराला औषधांची गरज पडणार नाही, अशी प्रतिबंधात्मक आरोग्याची संकल्पना या कुरळातून व्यक्त होते. आजार झाल्यावर उपचार करण्यापेक्षा योग्य आहारविहाराच्या सवयींनी आजार टाळण्याला प्राधान्य द्यावे, हा त्यामागील विचार आहे.

**योग्य प्रमाणात आहार**

*அற்றால் அளவறிந்து உண்க அஃதுஉடம்பு*
*பெற்றான் நெடிதுய்க்கும் ஆறு.* (குறள் 943)

अऱ्ऱाल् अळवऱिन्दु उण्ग अह्दुउडम्बु
पॆऱ्ऱाऩ् नॆडितुय्क्कुम् आऱु. (कुरळ 943)

पचनानंतर, योग्य प्रमाणात खा. हा मार्ग आहे
शरीराच्या मालकाला त्याचे आयुष्य वाढवण्यासाठी.

अन्नाचा दर्जा जितका महत्त्वाचा आहे, तितकेच त्याचे प्रमाणही महत्त्वाचे आहे. शरीराला आवश्यक असलेले अन्न किती आहे, हे जाणून योग्य प्रमाणात खाणे हा निरोगी जीवनाचा पाया आहे.

*மாறுபாடு இல்லாத உண்டி மறுத்துண்ணின்*
*ஊறுபாடு இல்லை உயிர்க்கு.* (குறள் 945)

माऱुबाडु इल्लाद उण्डि मऱुत्तुण्णिऩ्
ऊऱुबाडु इल्लै उयिर्क्कु. (कुरळ 945)

प्रकृतीला मानवणारा आहार प्रमाणात घेशील, तर कधीच शारीरिक
व्याधी होणार नाही.

शरीराला न मानवणारे अन्न टाळावे आणि आपल्या शरीराला अनुकूल अशी आहारपद्धती अंगीकारावी, हा विचारही या कुरळातून व्यक्त होतो.

तिरुक्कुरळातील आरोग्यविषयक विचारांमध्ये आजार झाल्यानंतर औषधोपचार करण्यापेक्षा, आजार

होण्यापूर्वी शिस्तबद्ध जीवन जगण्याला प्राधान्य दिले आहे. आहार, त्याचे योग्य प्रमाण, पचनक्रिया आणि शरीराची प्रकृती यांचे भान ठेवून जगणे, हाच निरोगी जीवनाचा पाया आहे.

## 5.10. तिरुक्कुरळातील वैद्यकीय नीती

तिरुक्कुरळातील 'औषध' या अध्यायात वैद्यकशास्त्र आणि वैद्य यांच्याविषयीचे विचार मांडले आहेत. रोगाचे स्वरूप, रोगाची कारणे, रोग दूर करण्याचे उपाय आणि रुग्णाची प्रकृती या सर्व गोष्टी जाणून घेतल्यानंतरच वैद्याने उपचार करावेत, असे या अध्यायातून स्पष्ट केले आहे.

*நோய்நாடி நோய்முதல் நாடி அதுதணிக்கும்*
*வாய்நாடி வாய்ப்பச் செயல்.* (குறள் 948)

नोय्नाडि नोय्मुदल् नाडि अदुतणिक्कुम्
वाय्नाडि वाय्प्पच् चॆयल्. (कुरळ 948)

वैद्याने रोग जडण्याचे कारण नि रोग हटण्याचे उपाय यांचा विचार करावे;
आणि नीट काळजी घेऊन रोग दूर करण्याच्या कामास लागावे.

प्रथम रोगाचे स्वरूप जाणून घेतले पाहिजे; त्यानंतर त्याचे कारण शोधले पाहिजे. मग त्यावरील उपायांचा विचार करून योग्य उपचार केले पाहिजेत. वैद्यकीय उपचारांकडे पाहण्याची हीच शिस्तबद्ध आणि योग्य पद्धत आहे, असा विचार या तिरुक्कुरळातून मांडला आहे.

### रुग्णकेंद्रित वैद्यकीय उपचार

*உற்றான் அளவும் பிணியளவும் காலமும்*
*கற்றான் கருதிச் செயல்.* (குறள் 949)

उऱ्ऱान् अळवुम् पिणियळवुम् कालमुम्
कऱ्ऱान् करुदिच् चॆयल्. (कुरळ 949)

चिकित्सकाने रोग्याची एकंदर स्थिती, रोगचिकित्सा व काळ ह्या सर्व गोष्टींचा विचार करावा; आणि मग रोग्याला बरे करण्याच्या मार्गाला लागावे.

एकाच रोगासाठी प्रत्येक रुग्णाला एकसारखी उपचारपद्धती योग्य ठरत नाही. रुग्णाची शारीरिक स्थिती, रोगाची तीव्रता आणि कालावधी या बाबींचा विचार करून वैद्याने उपचार करावेत, असे या कुरळातून स्पष्ट होते.

*உற்றவன் தீர்ப்பான் மருந்துழைச் செல்வான்என்று*
*அப்பால்நாற் கூற்றே மருந்து.* (குறள் 950)

उऱ्ऱवन् तीर्प्पान् मरुन्दुऴैच् चॆल्वान्ऎन्ऱु
अप्पाल्नाऱ् कूऱ्ऱे मरुन्दु. (कुरळ 950)

आजारी माणूस (रुग्ण), रोग बरा करणारा वैद्य, गुणकारी औषध आणि ते औषध तयार करणारा किंवा रुग्णाची सेवा करणारा परिचारक-या चार घटकांनी मिळूनच संपूर्ण वैद्यकीय उपचार पूर्ण होतो.

रुग्ण, वैद्य, औषध आणि वैद्यकीय साहाय्य या उपचारप्रक्रियेतील विविध घटकांचा समन्वय साधून विचार करण्याची

दृष्टी तिरुवल्लुवर मांडतात.

तिरुक्कुरळातील वैद्यकीय सदाचार म्हणजे केवळ रोग बरा करणे नव्हे; तर रुग्णाला समजून घेऊन, ज्ञानाने, सखोल विचारपूर्वक आणि जबाबदारीने उपचार करणे होय. केवळ रोगाकडे नव्हे, तर रुग्णाकडेही लक्ष देणारी वैद्यकीय दृष्टी, हेच या विचाराचे वैशिष्ट्य आहे.

### 5.11. तिरुक्कुरळातील मानसिक आरोग्यासाठीचे जीवनविषयक विचार

तिरुक्कुरळात 'मानसिक आरोग्य' या नावाचा स्वतंत्र अध्याय आढळत नसला, तरी चिंता, क्रोध, मत्सर, अतिलोभ, दुःख, मनोधैर्य, मैत्री, प्रेम आणि आत्मसंयम यांविषयीच्या कुरळांमधून मनःशांतीसाठी उपयुक्त अशी जीवनमूल्ये मांडली आहेत.

*அழுக்காறு அவாவெகுளி இன்னாச்சொல் நான்கும்*
*இழுக்கா இயன்றது அறம்.* (குறள் 35)
अऴुक्कारु अवावेहुळि इन्नाच्चोल् नान्गुम्
इऴुक्का इयन्ऱदु अऱम्. (कुरळ 35)

मत्सर, क्रोध, लोभ आणि कठोर वाणी यांचा
त्याग कर हाच धर्ममार्ग आहे.

मत्सर, अतिलोभ, क्रोध आणि दुःख देणारी वाणी या चार गोष्टींपासून दूर राहणे, हाच सदाचार होय.

मत्सर, अमर्याद इच्छा, क्रोध आणि इतरांना दुःख देणारे शब्द यांपासून दूर राहणे, हा सदाचार मानला आहे. या गोष्टी केवळ वैयक्तिक नातेसंबंधांवरच नव्हे, तर मनःशांतीवरही परिणाम करतात.

**दुःखाचा सामना करण्यासाठी मनोबल**

दुःख आल्यावर खचून जाणे हा मानवी स्वभाव आहे. यामुळे मनःशांती भंग पावते आणि मानसिक स्वास्थ्यावरही परिणाम होतो. अशा परिस्थितीत स्वतःचे रक्षण कसे करावे, याचा उपाय तिरुवल्लुवर सुचवतात. त्यांच्या मते, संकट आले असता माणसाने त्याचा आनंदाने स्वीकार केला, तर दुःखाचा त्याच्या मनावर होणारा परिणाम कमी होऊ शकतो. हा विचार पुढील कुरळातून व्यक्त होतो :

*இடுக்கண் வருங்கால் நகுக அதனை*
*அடுத்தூர்வது அஃதொப்பது இல்.* (குறள் 621)

इडुक्कण् वरुङ्गाल् नहुह अदनै
अडुत्तूर्वदु अह्दोप्पदु इल्. (कुरळ 621)

संकट/दुःख आल्यास प्रसन्न मुखाने त्याचे स्वागत करा. दुःख आले असता धीर द्यायला एकच वस्तू समर्थ आहे, ती म्हणजे चेहऱ्यावर हास्य.(सकारात्मक राहणे).

संकट आले असता हसतमुखाने त्याचा सामना करावा; संकटावर मात करण्यासाठी याहून श्रेष्ठ उपाय नाही.
याचा अर्थ दुःख नाकारावे असा नसून, संकटांमुळे पूर्णपणे खचून न जाता त्यांचा सामना करण्यासाठी मनाची दृढता विकसित करावी, असा आहे.

मानसिक स्वास्थ्यासाठी चांगले मानवी संबंधही आवश्यक आहेत. प्रेम, मैत्री, मधुर वाणी आणि कृतज्ञता यांना तिरुवल्लुवरांनी दिलेले महत्त्व हे माणसाच्या अंतर्मनातील स्वास्थ्याशी आणि सामाजिक संबंधांशी निगडित

आहे.

**मानसिक स्वास्थ्य जपण्याचे मार्ग**

इतरांची प्रगती पाहून मत्सर करणे मानसिक स्वास्थ्य बिघडवते. इतरांच्या प्रगतीचा मत्सर करण्याऐवजी, त्यांच्या यशाचे कौतुक करून आनंद मानावा. आपणही अशीच प्रगती करू शकतो आणि हे यश मिळवणे आपल्यालाही शक्य आहे, असा विश्वास ठेवून प्रयत्न करावेत. अशा दृष्टिकोनामुळे मानसिक स्वास्थ्य जपण्यास मदत होते. हा विचार पुढीलप्रमाणे मांडता येतो :

*அறனாக்கம் வேண்டாதான் என்பான் பிறனாக்கம்*

*பேணாது அழுக்கறுப் பான்.* (குறள் 163)

अऱऩाक्कम् वेण्डादाऩ् ऎऩ्बाऩ् पिऱऩाक्कम्
पेणादु अऴुक्कऱुप् पाऩ्. (कुरळ 163)

जो इतरांच्या प्रगतीचा आणि संपत्तीचा हेवा करतो, तो स्वतःचे कल्याण आणि पुण्य व्हावे असे इच्छित नाही.

दुसऱ्याची प्रगती सहन न करता तिचा मत्सर करणारा माणूस सदाचार आणि कल्याणाची इच्छा नसलेला असतो.

तिरुक्कुरळाचा संदेश असा आहे की, मनःशांती बाहेर शोधण्यापूर्वी स्वतःच्या मनाला योग्य दिशा दिली पाहिजे. स्वतःच्या भावनांना ओळखणे, त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे, दुःखाच्या प्रसंगी खचून न जाणे आणि प्रेमपूर्ण नातेसंबंध जोपासणे, ही तिरुक्कुरळाने सांगितलेली जीवनमूल्ये आहेत.

## 5.12. तिरुक्कुरळातील मानवतावाद (माणुसकी)

माणसाला माणूस म्हणून सन्मान देणे, इतरांचे दुःख जाणून घेणे, मदत करणे, कोणालाही हानी न पोहोचवणे, भुकेल्याची भूक भागवणे आणि सर्वांशी प्रेमाने वागणे, ही मानवतावादाची मूलभूत तत्त्वे आहेत. तिरुक्कुरळात हा विचार विविध स्वरूपांतून सर्वत्र व्यक्त झाला आहे.

*அன்பிலார் எல்லாம் தமக்குரியர் அன்புடையார்*

*என்பும் உரியர் பிறர்க்கு.* (குறள் 72)

अऩ्बिलार् ऎल्लाम् तमक्कुरियर् अन्बुडैयार्
ऎऩ्बुम् उरियर् पिऱर्क्कु. (कुरळ 72)

प्रेम न करणारा व्यक्ती सर्वस्व आपल्यापुरतेच ठेवतो

परंतू प्रेम करणारे दूसऱ्यासाठी सर्वस्व देऊन टाकतील.

प्रेम नसलेले लोक केवळ स्वतःपुरते जगतात; परंतु प्रेम असलेले लोक आपल्या शरीरासह सर्वस्व इतरांसाठी अर्पण करतात.
स्वतःच्या स्वार्थापलीकडे जाऊन इतरांचाही विचार करणारे मन, हीच मानवतावादाची सुरुवात आहे.

*அறிவினான் ஆகுவது உண்டோ பிறிதின்நோய்*
*தம்நோய்போல் போற்றாக் கடை.* (குறள் 315)

अऱिविऩाऩ् आहुवदु उण्डो पिऱिदिन्नोय्
तम्नोय्पोल् पोऱ्ऱाक् कडै. (कुरळ 315)

दुसऱ्याचे दुःख ते आपलेच दुःख असे समजणारा, दुसऱ्यास दुःख

इतरांचे दुःख स्वतःच्या दुःखाप्रमाणे जपून समजून घेतले नाही, तर त्या ज्ञानाचा उपयोग काय?

इतरांचे दुःख स्वतःच्या दुःखाप्रमाणे जाणवत नसेल, तर अशा ज्ञानाचा काय उपयोग, असा प्रश्न या कुरळातून उपस्थित होतो. यात मानवतावादाचे महत्त्व अधोरेखित होते. ज्ञानाचे श्रेष्ठत्व त्याच्या प्रमाणात नसून, ते इतरांच्या उपयोगी पडते की नाही, यावर अवलंबून असते.

**दानशीलता आणि मानवतावाद**

खरोखर गरजू असलेल्या व्यक्तीला मदत केली जाते, तेव्हाच त्या कृतीला दानशीलता म्हणता येते. हे पुढील कुरळातून स्पष्ट होते :

*வறியார்க்குஒன்று ஈவதே ஈகைமற் றெல்லாம்*
*குறியெதிர்ப்பை நீர துடைத்து.* (குறள் 221)
वऱियार्क्कुऒन्ऱु ईवदे ईहैमऱ् ऱॆल्लाम्
कुऱियॆदिर्प्पै नीर तुडैत्तु. (कुरळ 221)

दरिद्री पीडित लोकाला देणे ही खरी दया इतरांना देणे
म्हणजे प्रति उपकार देण्याप्रमाणे आहे.

गरिबांना मदत करणे, हेच खरे दान होय; इतर सर्व प्रकारच्या देण्यामागे काही ना काही अपेक्षा असते.
कोणतीही अपेक्षा न ठेवता केलेली मदत हा मानवतावादाचा श्रेष्ठ आविष्कार आहे. तिरुक्कुरळातील मानवतावाद म्हणजे 'मी' या विचारातून 'आपण' या व्यापक भावनेकडे जाणारा मनाचा प्रवास होय. इतरांचे दुःख जाणून घेऊन त्यांच्या कल्याणासाठी कृती केली जाते, तेव्हाच ज्ञान आणि संपत्ती यांना खरे मानवी मूल्य प्राप्त होते.

## 5.13. तिरुक्कुरळातील सामाजिक सलोखा

समाज केवळ कायद्यांच्या आधारावर टिकून राहत नाही. एकमेकांचा आदर करणे, प्रेम, न्याय, सहनशीलता, मधुर वाणी आणि परस्परांशी जुळवून घेण्याची वृत्ती हे गुण सामाजिक सलोख्याचा पाया आहेत.

*இனிய உளவாக இன்னாத கூறல்*
*கனியிருப்பக் காய்கவர்ந் தற்று.* (குறள் 100)

इऩिय उळवाह इऩ्ऩाद कूऱल्
कऩियिरुप्पक् काय्कवर्न् तऱ्ऱु. (कुरळ 100)

गोड बोलण्याने काम होत असतानाही जो कठोर बोलतो,
तो पिकलेले फळ टाकून कच्चे पसंत करतो.

गोड शब्द बोलता येत असताना कटू शब्द बोलणे म्हणजे पिकलेले फळ सोडून कच्चे फळ निवडण्यासारखे आहे.

मधुर शब्द बोलण्याऐवजी कठोर शब्द वापरणे म्हणजे पिकलेले फळ बाजूला ठेवून कच्चे फळ निवडण्यासारखे आहे. नातेसंबंध जपण्यात शब्दांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. त्यामुळे सामाजिक संबंधांमध्ये भाषेचा वापर जबाबदारीने करणे किती आवश्यक आहे, हे या कुरळातून स्पष्ट होते.

### वाईटाला चांगुलपणाने उत्तर देणे

'जशास तसे' या सूडाच्या चक्राला पुढे चालू न ठेवता, वाईटाला चांगुलपणाने उत्तर देणे, हाच श्रेष्ठ गुण आहे, असे तिरुवल्लुवर सांगतात. सामाजिक सलोख्याचा हा एक सखोल नैतिक दृष्टिकोन आहे. हा विचार स्पष्ट करणारा तिरुक्कुरळ पुढीलप्रमाणे आहे :

*இன்னாசெய் தாரை ஒறுத்தல் அவர்நாண*
*நன்னயம் செய்து விடல்.* (குறள் 314)

इऩ्ऩासॆय् दारै ऒऱुत्तल् अवर्नाण
नऩ्ऩयम् सॆय्दु विडल्. (कुरळ 314)

अपकार करणाऱ्यावर उपकार करून त्याला मनात
लाजवणारा मोठ्या मनुष्याचे काम असे म्हणतात.

ज्यांनी आपल्याला दुःख दिले, त्यांना लाज वाटेल अशा रीतीने त्यांच्याशी चांगले वागणे, हाच त्यांना दिलेला खरा धडा होय.

### निष्पक्षता

सामाजिक सलोख्यासाठी न्यायाला सर्वाधिक महत्त्व आहे. कोणताही पक्षपात न करता सर्वांशी समानतेने वागण्याची निष्पक्ष वृत्ती नसेल, तर दीर्घकाळ टिकणारा एकोपा निर्माण होऊ शकत नाही. त्यामुळे तिरुक्कुरळातील सामाजिक सलोखा म्हणजे मतभेद नष्ट करणे नव्हे; तर मतभेद असतानाही मानवी सद्गुणांचे जतन करणे होय.

प्रेम, मधुर वाणी, सहनशीलता, न्याय आणि क्षमाशीलता हे तिरुक्कुरळाने सांगितलेल्या सामाजिक सलोख्याचे आधारस्तंभ आहेत. एकोपा म्हणजे सर्वांनी एकसारखे असणे नव्हे; तर भिन्न विचारांच्या आणि स्वभावांच्या लोकांनीही परस्परांचा आदर राखून एकत्र राहणे होय.

## 5.14. तिरुक्कुरळातील मैत्री

तिरुक्कुरळात मैत्रीला केवळ विरंगुळयासाठी असलेले नाते मानलेले नाही. योग्य मित्राची निवड करणे, मैत्रीची पारख करणे, खरी मैत्री जपणे आणि वाईट संगत टाळणे, अशा मैत्रीच्या विविध पैलूंचा तिरुवल्लुवरांनी विचार केला आहे.

*முகநக நட்பது நட்பன்று நெஞ்சத்து*
*அகநக நட்பது நட்பு.* (குறள் 786)

मुहनह नट्पदु नट्पऩ्ऱु नॆञ्जत्तु
अहनह नट्पदु नट्पु. (कुरळ 786)

तोंडदेखल्या स्मित करणे म्हणजे मैत्री नव्हे;
हृदयाला हसविणारी प्रिती जेथे असते तेथे मैत्री असते.

चेहऱ्यावर हसणे म्हणजे मैत्री नव्हे; तर अंतःकरणातून उमलणारे खरे प्रेम म्हणजे मैत्री होय.

फक्त चेहऱ्यावर हास्य दाखवणे म्हणजे मैत्री नव्हे; तर मनापासून उमटणारे प्रेम आणि आपुलकी हेच खऱ्या मैत्रीचे लक्षण आहे.

**चुका सुधारून देणारा मित्र**

मित्र म्हणजे केवळ आनंदाच्या क्षणी सोबत असणारी व्यक्ती नव्हे. चुकीच्या मार्गापासून दूर ठेवणारा आणि दुःखाच्या प्रसंगी खंबीरपणे साथ देणारा, हाच खरा मित्र आहे, अशी मैत्रीची व्याख्या तिरुवल्लुवर करतात.

அழிவின் அவைநீக்கி ஆறுஉய்த்து அழிவின்கண்
அல்லல் உழப்பதாம் நட்பு. (குறள் 787)
अऴिविन् अवैनीक्कि आऱुउय्त्तु अऴिविऩ्कण्
अल्लल् उऴप्पदाम् नट्पु. (कुरळ 787)

पापासून परावृत्त करणारा, सन्मार्गाकडे वळविणारा,
विपत्तीत बाजू घेणारा, तो खरा मित्र.

मित्राला संकटाकडे नेणाऱ्या गोष्टींपासून दूर ठेवणे, योग्य मार्ग दाखवणे आणि संकटाच्या वेळी त्याचे दुःख हलके करणे, हेच मैत्रीचे कर्तव्य आहे.
या कुरळातून तिरुवल्लुवर मैत्रीतील जबाबदारी अधोरेखित करतात. दुःखात सापडलेल्या मित्राला आधार देण्याचे महत्त्व ते एका सुंदर उपमेद्वारे स्पष्ट करतात.

உடுக்கை இழந்தவன் கைபோல ஆங்கே
இடுக்கண் களைவதாம் நட்பு. (குறள் 788)

उडुक्कै इऴन्दवन् कैपोल आङ्गे
इडुक्कण् कळैवदाम् नट्पु. (कुरळ 788)

वाऱ्याने कमरेचे वस्त्र उडवले जात असता ते सावरण्यासाठी हात ज्याप्रमाणे
झटकन धावतो, त्याप्रमाणे उघड्या पडलेल्या मित्राच्या साहाय्यास धावतो तोच खरा मित्र.

अंगावरील वस्त्र निसटू लागल्यावर हात जसा तत्काळ ते सावरतो, त्याचप्रमाणे मित्रावरील संकट दूर करण्यासाठी तत्परतेने धावून जाणे, हीच खरी मैत्री होय.

वस्त्र निसटताना हात जसा सहजपणे आणि त्वरित मदतीला धावतो, त्याचप्रमाणे मित्राच्या दुःखाच्या वेळी त्याने मदतीसाठी हाक मारण्याची वाट न पाहता त्याला मदत करणे, हे खऱ्या मैत्रीचे लक्षण आहे, असे तिरुवल्लुवर सांगतात.

आनंद वाटून घेण्यापेक्षाही मित्राच्या चुका सुधारून देणे, दुःखाच्या वेळी त्याच्या पाठीशी उभे राहणे आणि त्याच्याशी प्रामाणिक राहणे, यांतच मैत्रीचे खरे मूल्य आहे.

## 5.15. तिरुक्कुरळातील राजकारण

तिरुक्कुरळाच्या अर्थविभागात राज्य, राज्यकर्ता, मंत्री, किल्ला, सैन्य, नागरिक, न्याय, अर्थव्यवस्था, दूतकार्य अशा विविध राजकीय घटकांची सविस्तर चर्चा केली आहे. तिरुवल्लुवर यांच्या राजकीय विचारांमध्ये लोककल्याण आणि न्याय यांना प्राधान्य दिले आहे.

படைகுடி கூழ்அமைச்சு நட்புஅரண் ஆறும்
உடையான் அரசருள் ஏறு. (குறள் 381)

पडैकुडि कूऴ्अमैच्चु नट्पुअरण आऱुम्
उडैयान् अरसरुळ् एऱु. (कुरळ 381)

ज्या शासकाकडे सैन्य, प्रजा, संपत्ती, मंत्री, मित्र आणि किल्लेकोट या सहा वस्तू ज्याच्याजवळ
आहेत तोच खरा राजसिंह ठरतो.

सैन्य, नागरिक, आर्थिक संपन्नता, मंत्री, मैत्री आणि किल्ला या सहा घटकांनी युक्त असलेला राजा राजांमध्ये श्रेष्ठ ठरतो.

राज्याच्या कारभारासाठी आवश्यक असलेले सैन्य, नागरिक, आर्थिक संपन्नता, मंत्रिमंडळ, मैत्रीपूर्ण संबंध आणि संरक्षणव्यवस्था हे सहा महत्त्वाचे घटक तिरुवल्लुवर यांनी या कुरळात नमूद केले आहेत.

**न्याय्य शासन**

வான்நோக்கி வாழும் உலகெல்லாம் மன்னவன்
கோல்நோக்கி வாழும் குடி. (குறள் 542)
वान्नोक्कि वाऴुम् उलहॆल्लाम् मन्नवन्
कोल्नोक्कि वाऴुम् कुडि. (कुरळ 542)

जग जगण्यासाठी आकाशातील ढगांकडे दृष्टी असते. त्याप्रमाणे
रक्षणासाठी लोकांचे डोळे राजदंडाकडे असतात.

ज्याप्रमाणे संपूर्ण जग पावसाच्या प्रतीक्षेत जगते, त्याचप्रमाणे प्रजेचे जीवन राजाच्या न्याय्य राजदंडावर अवलंबून असते. पावसाची अपेक्षा करणाऱ्या जगाप्रमाणेच नागरिकांचे जीवनही शासनाच्या न्याय्य कारभारावर अवलंबून असते, हा विचार या कुरळातून व्यक्त होतो. राजकारण हे एखाद्या व्यक्तीच्या प्रतिष्ठेसाठी वापरण्याचे साधन नसून, लोकांचे संरक्षण करणे आणि त्यांच्या कल्याणाची जबाबदारी पार पाडणे, हेच तिरुक्कुरळाचे मूलभूत तत्त्व आहे. तिरुक्कुरळाच्या राजकीय तत्त्वज्ञानात अधिकारापेक्षा न्यायाला, राज्यकर्त्यांपेक्षा नागरिकांच्या कल्याणाला आणि सामर्थ्यापेक्षा जबाबदारीच्या भावनेला अधिक महत्त्व दिले आहे.

## 5.16. तिरुक्कुरळातील प्रशासकीय कौशल्य

प्रशासन म्हणजे केवळ निर्णय घेणे नव्हे; तर योग्य काम योग्य व्यक्तीकडे योग्य वेळी सोपवणे, त्याच्या परिणामांचे मूल्यमापन करणे आणि ते काम यशस्वीपणे पूर्ण करणे होय. तिरुक्कुरळातील अनेक अध्यायांमध्ये अशा प्रशासकीय तत्त्वांचा उल्लेख आढळतो.

இதனை இதனால் இவன்முடிக்கும் என்றாய்ந்து
அதனை அவன்கண் விடல். (குறள் 517)

इदनै इदऩाल् इवऩ्मुडिक्कुम् ऎऩ्ऱाय्न्दु
अदनै अवऩ्कण् विडल्. (कुरळ 517)

त्या त्या माणसाची पात्रता, शक्ती बघून मगच कोणत्याही कामाची जबाबदारी त्याच्यावर सोपवावी. एखादे काम कोणत्या साधनांनी आणि कोणत्या व्यक्तीकडून यशस्वीपणे पूर्ण होऊ शकते, याचा विचार करून ते काम त्या व्यक्तीकडे सोपवावे.

एखादे काम कोणत्या व्यक्तीकडून आणि कोणत्या पद्धतीने प्रभावीपणे पूर्ण केले जाऊ शकते, याचे मूल्यमापन करूनच ते तिच्याकडे सोपवावे. हे तत्त्व प्रशासनातील ‘योग्य कामासाठी योग्य व्यक्तीची निवड’ या संकल्पनेशी संबंधित आहे.

**नियोजन आणि अंमलबजावणी**

எண்ணித் துணிக கருமம் துணிந்தபின்
எண்ணுவம் என்பது இழுக்கு. (குறள் 467)
ऎण्णित् तुणिह करुमम् तुणिन्दपिऩ्
ऎण्णुवम् ऎऩ्बदु इऴुक्कु. (कुरळ 467)

पूर्ण विचार केल्यावाचून काहीही नक्की करू नको; आधी काऱ्याला आरंभ करून मागून मग विचार करीन असे जो मनात म्हणतो तो मूर्ख होय.

कोणतेही कार्य करण्यापूर्वी त्याचा पूर्ण विचार करून मगच ते हाती घ्यावे. एकदा निर्णय घेतल्यानंतर पुन्हा विचार करत बसणे ही चूक होय.

कोणतेही कार्य सुरू करण्यापूर्वी त्याचा सखोल विचार करणे आवश्यक आहे; मात्र एकदा निर्णय घेतल्यानंतर अनावश्यक संकोच करू नये. नियोजन आणि अंमलबजावणी यांच्यातील समतोल तिरुवल्लुवर या कुरळातून स्पष्ट करतात.संसाधने, वेळ, कार्यपद्धती आणि कठीण काम पूर्ण करण्याची क्षमता यांची जाणीव असणे, हे उत्तम प्रशासनाचे लक्षण आहे. हे तत्त्व पुढील कुरळातून स्पष्ट होते.

கருவியும் காலமும் செய்கையும் செய்யும்
அருவினையும் மாண்டது அமைச்சு. (குறள் 631)

करुवियुम् कालमुम् सॆय्हैयुम् सॆय्युम्
अरुविऩैयुम् माण्डदु अमैच्चु. (कुरळ 631)

मोठमोठ्या गोष्टी कशा सिद्धीस न्याव्यात, तदर्थ साधने कोणती, मार्ग कोणते, आरंभ केव्हा करावा, हे सारे जो जाणतो तो मंत्री नेमण्यास योग्य होय.

साधने, योग्य वेळ, कार्यपद्धती आणि कठीण कार्य पूर्ण करण्याची क्षमता या सर्व बाबींचे ज्ञान असणे, हे उत्तम मंत्र्याचे लक्षण होय.

तिरुक्कुरळातील प्रशासकीय विचारांमध्ये नियोजन, योग्य मनुष्यबळाची निवड, समयसूचकता, जबाबदाऱ्यांचे वाटप आणि कार्यक्षमता यांचा समन्वय साधलेला दिसतो. उत्तम प्रशासक म्हणजे प्रत्येक काम स्वतः करणारी व्यक्ती नव्हे, तर इतरांकडून काम प्रभावीपणे करून घेणारी व्यक्ती होय.

## 5.17. तिरुक्कुरळातील आर्थिक विचार

तिरुक्कुरळामध्ये सदाचाराच्या मार्गाने संपत्ती मिळवणे, तिचे संरक्षण करणे, तिचा योग्य प्रकारे उपयोग करणे आणि ती इतरांच्याही उपयोगी पडेल अशा रीतीने वापरणे यांवर भर दिला आहे. त्यामुळे अर्थव्यवस्थेचा संबंध मानवी कल्याणाशी जोडला जातो.

இயற்றலும் ஈட்டலும் காத்தலும் காத்த
வகுத்தலும் வல்லது அரசு. (குறள் 385)

इयऱ्ऱलुम् ईट्टलुम् कात्तलुम् कात्त
वहुत्तलुम् वल्लदु अरसु. (कुरळ 385)

संपत्तीचे मार्ग निर्माण करणे, ती मिळवणे, तिचे रक्षण करणे आणि प्रजेच्या कल्याणासाठी तिचा योग्य विनियोग (खर्च) करणे, हेच आदर्श शासनाचे लक्षण आहे.

उत्पन्न निर्माण करणे, संपत्ती मिळवणे, तिचे संरक्षण करणे आणि तिचे योग्य प्रकारे वाटप करणे, या गोष्टी करण्यात कुशल असलेले राज्य हे उत्तम राज्य होय.

उत्पन्नाची निर्मिती करणे, संपत्ती मिळवणे, तिचे संरक्षण करणे आणि त्यानंतर तिचे योग्य पद्धतीने वितरण करणे, हे उत्तम आर्थिक प्रशासनाचे महत्त्वाचे घटक आहेत.

### संपत्तीचा सामाजिक उपयोग

एखादा देश आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण असतो, तेव्हा त्याची आर्थिक ताकद शत्रूंच्या आक्रमकतेला आळा घालण्यास मदत करते. प्रत्येक देशाने अशा प्रकारची आर्थिक प्रगती साधली पाहिजे, हा विचार तिरुवल्लुवर मांडतात. तो पुढील कुरळातून व्यक्त होतो.

*செய்க பொருளைச் செறுநர் செருக்கறுக்கும்*

*எஃகுஅதனிற் கூரியது இல்.* (குறள் 759)
सॆय्ह पॊरुळैच् चॆरुनर् सॆरुक्करुक्कुम्
ऎह्हुअदनिऱ् कूरियदु इल्. (कुरळ 759)

द्रव्य भरपूर मिळवावे. शत्रूचा अभिमान धुळीस मिळवायला
यासारखे तीक्ष्ण शस्त्र नाही.

संपत्ती मिळवा; कारण शत्रूंचा गर्व नष्ट करण्यासाठी तिच्याइतके धारदार शस्त्र दुसरे नाही.

आर्थिक सामर्थ्य व्यक्तीला आणि राज्याला कार्य करण्याची क्षमता प्रदान करते. मात्र, संपत्ती ही सदाचाराच्या मर्यादेत राहिली पाहिजे, हा तिरुक्कुरळाचा व्यापक विचार आहे. दान, परस्पर सहकार्य आणि अतिथी-सत्कार यांसारख्या अध्यायांमधून संपत्तीशी निगडित सामाजिक जबाबदारीही स्पष्ट होते. त्यामुळे संपत्ती मिळवण्याचा अंतिम उद्देश केवळ तिचा संचय करणे नसून, तिचा इतरांच्या हितासाठी उपयोग करणे हाही आहे.

तिरुक्कुरळातील आर्थिक विचारांमध्ये उत्पादन, संपादन, संरक्षण आणि वितरण या घटकांचा समावेश होतो. संपत्तीने माणसावर नियंत्रण गाजवू नये; उलट तिचा उपयोग मानवी कल्याणासाठी झाला पाहिजे. सदाचाराशी जोडलेली अर्थव्यवस्थाच शाश्वत संपत्तीचा आधार ठरते, हा तिरुवल्लुवर यांचा मूलभूत संदेश आहे.

## 5.18. तिरुक्कुरळातील शेती

तिरुवल्लुवर शेतीकडे केवळ एक व्यवसाय म्हणून पाहत नाहीत, तर तिला सामाजिक जीवनाचा पाया मानतात. अन्नाचे उत्पादन नसेल, तर जगाचे व्यवहार सुरळीत चालू शकत नाहीत. म्हणूनच तिरुवल्लुवर यांनी शेतकऱ्यांना समाजात उच्च स्थान दिले आहे.

*சுழன்றும்ஏர்ப் பின்னது உலகம் அதனால்*

*உழந்தும் உழவே தலை.* (குறள் 1031)
सुऴऩ्ऱुम्एर्प् पिऩ्ऩदु उलहम् अदऩाल्
उऴन्दुम् उऴवे तलै. (कुरळ 1031)

कोठेही गेलात तरी शेवटी अन्नासाठी नांगराच्या पाठीमागे उभे राहावे
लागणारच. किती कष्ट पडले तरी शेवटी कृषी हाच सर्वोत्तम धंदा होय, प्रमुख धंदा होय .

संपूर्ण जग अनेक व्यवसायांत गुंतलेले असले, तरी शेवटी ते अन्नासाठी शेतीवरच अवलंबून असते. म्हणून कष्टाची असली, तरी शेतीच सर्वश्रेष्ठ आहे.

जगातील लोक विविध व्यवसायांत गुंतलेले असले, तरी त्यांच्या अन्नाची गरज शेतीतूनच पूर्ण होते. त्यामुळे शेती हा सर्व व्यवसायांचा आधार आहे.

**समाजाचा मूलाधार**

शेती ही जगातील सर्व सजीवांची भुकेची व्यथा दूर करून त्यांना आनंद आणि मनःशांती देणारी आहे. भुकेची व्याधी दूर करणाऱ्या वैद्यांप्रमाणे शेतकऱ्यांचा गौरव करताना तिरुवल्लुवर म्हणतात,

உழுதுண்டு வாழ்வாரே வாழ்வார்மற் றெல்லாம்
தொழுதுண்டு பின்செல் பவர். (குறள் 1033)

उऴुदुण्डु वाऴ्वारे वाऴ्वार्मऱ् ऱॆल्लाम्
तॊऴुदुण्डु पिऩ्सॆल् बवर्. (कुरळ 1033)

जमीन कसून जे राहतात, तेच खरोखर जगतात. बाकी संपूर्ण जग
त्यांच्या पाठोपाठ येते नि मिंधेपणाची भाकर खाते.

स्वतः शेती करून मिळवलेल्या अन्नावर जगणारेच खऱ्या अर्थाने जगतात; इतर सर्वजण दुसऱ्यांपुढे हात जोडून त्यांच्या मागे चालणारे असतात.
कष्टातून अन्न निर्माण करणाऱ्या शेतकऱ्यांचे स्वावलंबन आणि समाजातील त्यांचे योगदान या कुरळातून अधोरेखित होते.

உழவினார் கைம்மடங்கின் இல்லை விழைவதூஉம்
விட்டேமென் பார்க்கு நிலை. (குறள் 1036)

उऴविऩार् कैम्मडङ्गिऩ् इल्लै विऴैवदूउम्
विट्टेमॆऩ् बार्क्कुम् निलै. (कुरळ 1036)

शेतकरी हात जोडून बसेल तर सर्व इच्छांचा त्याग करणाऱ्या
निरिच्छ लोकांसही जगणे जड जाईल.
शेतकऱ्यांचे हात काम करेनासे झाले, तर सर्व काही त्यागून जगू, असे म्हणणाऱ्यांनाही जगणे शक्य होणार नाही.

शेतकऱ्यांचे हात थांबले, तर इतर क्षेत्रांवरही त्याचा परिणाम होतो, हे सामाजिक आणि आर्थिक वास्तव तिरुवल्लुवर या कुरळातून स्पष्ट करतात. तिरुक्कुरळात शेती म्हणजे केवळ अन्नाचे उत्पादन नव्हे, तर मानवी समाजाचा जीवनाधार आहे. शेतकऱ्यांचा सन्मान करणे म्हणजे केवळ एका व्यवसायाचा सन्मान करणे नव्हे, तर मानवी जीवनाला आधार देणाऱ्या मूलभूत श्रमांचा गौरव करणे होय.

## 5.19. तिरुक्कुरळातील पर्यावरण

'पर्यावरण' या विषयावरील विचार तिरुक्कुरळात थेट मांडलेले नसले, तरी पाऊस, पाणी, शेती, सर्व सजीवांप्रती प्रेम, अहिंसा आणि मर्यादित उपभोग अशा संकल्पनांच्या माध्यमातून निसर्ग आणि मानवी जीवन यांच्यातील परस्परसंबंध तिरुक्कुरळाने स्पष्ट केले आहेत.

### पाण्याचे महत्त्व

जगातील जीवनचक्र कोणत्याही अडथळयाविना सुरू राहण्यासाठी जलसंपत्ती अत्यावश्यक आहे. जलसंपत्तीचे महत्त्व तिरुवल्लुवर पुढील कुरळातून स्पष्ट करतात.

*நீர்இன்று அமையாது உலகெனின் யார்யார்க்கும்*

*வான்இன்று அமையாது ஒழுக்கு.* (குறள் 20)

नीरिऩ्ऱु अमैयादु उलहॆऩिऩ् यार्यार्क्कुम्
वाऩ्इऩ्ऱु अमैयादु ऒऴुक्कु. (कुरळ 20)

पाणी नसेल तर जीवनच नाही म्हणून शीलवान
वर्तनही अंती पावसावरच अवलूंबन आहे.

जगात पाण्याशिवाय जीवन शक्य नाही; त्याचप्रमाणे कोणासाठीही पावसाशिवाय जीवनाचे व्यवहार सुरळीत चालू शकत नाहीत.
पाण्याविना जगातील जीवनव्यवहार चालू शकत नाहीत. म्हणूनच पाण्याचा मुख्य स्रोत असलेल्या पावसाचे महत्त्वही तिरुवल्लुवर अधोरेखित करतात.

*விசும்பின் துளிவீழின் அல்லால்மற் றாங்கே*

*பசும்புல் தலைகாண்பு அரிது.* (குறள் 16)
विसुम्बिऩ् तुळिवीऴिऩ् अल्लाल्मऱ् ऱाङ्गे
पसुम्पुल् तलैकाण्बु अरिद. (कुरळ 16)

आकाशातून पावसाचे थेंब पडले नाहीत तर हे
चिमणे गवतही वाढणार नाही.

आकाशातून पावसाचे थेंब पडले नाहीत, तर तेथे हिरव्या गवताचे एक पाते उगवलेले पाहणेही कठीण होईल.

एका लहानशा हिरव्या गवताच्या पात्याच्या अस्तित्वासाठीही पाऊस आवश्यक आहे, हे या कुरळातून स्पष्ट होते. मनुष्य, वनस्पती, पाणी आणि पाऊस हे स्वतंत्र घटक नसून, एकमेकांशी जोडलेल्या नैसर्गिक साखळीचे भाग आहेत, हा विचार तिरुवल्लुवर मांडतात.

### सर्व सजीवांप्रती प्रेम आणि पर्यावरण

एखाद्या देशात पाण्याची कमतरता निर्माण झाली, तर त्याची समृद्धी कमी होऊन तो दारिद्र्याच्या स्थितीत पोहोचतो. त्यामुळे रोगराई, भूक आणि शत्रुत्व वाढून देशाचे सामान्य जीवन विस्कळीत होते. म्हणूनच या समस्यांचे निराकरण करण्यासाठी जलसंपत्ती हा सर्वांत महत्त्वाचा आधार आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीने देश समृद्ध असेल, तर भुकेची समस्या दूर होऊ शकते. सर्वांना अन्न मिळाल्याने मानसिक आणि शारीरिक आरोग्य सुधारते. तसेच, सर्वांना आवश्यक गोष्टी उपलब्ध झाल्याने शत्रुत्वाची भावनाही कमी होते. अशा परिस्थितीत दान आणि तपश्चर्या यांचाही

आचरणात समावेश करता येतो. म्हणून निसर्गाचे संरक्षण करणे हे आपले कर्तव्य आहे, यावर तिरुवल्लुवर पुढील कुरळातून भर देतात.

*தானம் தவமிரண்டும் தங்கா வியனுலகம்*

*வானம் வழங்காது எனின்.* (குறள் 19)

दाऩम् तवमिरण्डुम् तङ्गा वियऩुलहम्
वाऩम् वऴङ्गादु ऎऩिऩ्. (कुरळ 19)

आकाशाने पाऊस पाडला नाही तर या विशाल

पृथ्वीवर दान, तपस्याही दिसणार नाहीत.

पाऊस पडला नाही, तर या विशाल जगात दान आणि तपश्चर्या या दोन्ही गोष्टी टिकून राहू शकणार नाहीत.

तिरुक्कुरळातील पर्यावरणविषयक विचार माणूस निसर्गापासून वेगळा राहू शकत नाही, याची जाणीव करून देतात. निसर्गाचे संरक्षण करणे म्हणजे केवळ बाह्य जगाचे रक्षण करणे नव्हे, तर मानवी जीवनाच्या पायाचेच संरक्षण करणे होय, हाच तिरुवल्लुवर यांचा संदेश आहे.

## 5.20. तिरुक्कुरळातील कौटुंबिक नीती

तिरुक्कुरळात कुटुंबाकडे केवळ वैयक्तिक निवासस्थान म्हणून पाहिलेले नाही, तर सदाचाराची जडणघडण होणारी पहिली सामाजिक संस्था म्हणून पाहिले आहे. प्रेम, जबाबदारी, अतिथी-सत्कार, संततीप्राप्ती आणि मधुर नातेसंबंध हे कौटुंबिक सदाचाराचे महत्त्वाचे घटक आहेत.

*அன்பும் அறனும் உடைத்தாயின் இல்வாழ்க்கை*

*பண்பும் பயனும் அது.* (குறள் 45)

अऩ्बुम् अऱऩुम् उडैत्तायिऩ् इल्वाऴ्क्कै
पण्बुम् पयऩुम् अदु. (कुरळ 45)

ज्या घरात सदाचार आहे आणि भरपूर प्रेम
आहे, ते घर कृतार्थ झाले.

कौटुंबिक जीवनात प्रेम आणि सदाचार नांदत असतील, तर तेच त्या जीवनाचे सौंदर्य आणि फलित होय.
कुटुंबाचे मोठेपण संपत्तीत नसते; ते प्रेम आणि सदाचाराने समृद्ध असलेल्या नातेसंबंधांत असते.

### कुटुंबाची सामाजिक जबाबदारी

वैयक्तिक जीवन म्हणजे केवळ स्वतःसाठी आणि आपल्या कुटुंबासाठी जगणे नव्हे. प्रत्येक व्यक्तीने ज्या जगाने तिला घडवले आणि तिचे संगोपन केले, त्या जगाप्रती आपल्याकडून शक्य होईल तेवढे कर्तव्य पार पाडले पाहिजे. मोठ्या प्रमाणावर सामाजिक कार्य करणे शक्य नसले, तरी आपल्या सभोवतालच्या नातलगांची आणि इतर सजीवांची आपल्या परीने काळजी घेणे, हे प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य आहे. हा विचार लक्षात घेऊन तिरुवल्लुवर यांनी कौटुंबिक जीवन जगणाऱ्या व्यक्तीने पार पाडावयाच्या जबाबदाऱ्या स्पष्टपणे सांगितल्या आहेत. संन्याशांना, गरिबांना आणि आपल्या दिवंगत पूर्वजांशी संबंधित धार्मिक कर्तव्यांना आधार देणे, हे गृहस्थजीवनातील सदाचाराचे अंग आहे. कौटुंबिक जीवनात आचरणात आणावयाच्या या तत्त्वाचे वर्णन तिरुवल्लुवर पुढील कुरळात करतात.

இல்வாழ்வான் என்பான் இயல்புடைய மூவர்க்கும்
நல்லாற்றின் நின்ற துணை. (குறள் 41)

इल्वाऴ्वान् ऎऩ्बाऩ् इयल्बुडैय मूवर्क्कुम्
नल्लाऱ्ऱिऩ् निऩ्ऱ तुणै. (कुरळ 41)

इतर तीन धार्मिक आश्रमांचा मुख्य आधार
गृहस्थाश्रम हा आहे.

गृहस्थाश्रमी तोच, जो स्वभावतः आधाराची अपेक्षा करणाऱ्या तिन्ही वर्गांना सन्मार्गाने जगण्यासाठी आधार देतो.
कौटुंबिक जीवन हे केवळ स्वतःपुरते मर्यादित नसते; त्यात इतरांनाही आधार देण्याची सामाजिक जबाबदारी अंतर्भूत असते. अशा सामाजिक जबाबदारीचा पाया सुदृढ कौटुंबिक व्यवस्था हा आहे. म्हणूनच कुटुंबाच्या उत्कर्षासाठी सद्‌गुणसंपन्न पत्नी आणि कुटुंबाच्या विकासाला पुढच्या टप्प्यावर नेणारी सुसंस्कारित संतती आवश्यक आहे, हे तिरुवल्लुवर पुढील कुरळातून स्पष्ट करतात.

மங்கலம் என்ப மனைமாட்சி மற்றதன்
நன்கலம் நன்மக்கட் பேறு. (குறள் 60)

मङ्गलम् ऎऩ्ब मऩैमाट्चि मऱ्ऱदऩ्
नऩ्गलम् नऩ्मक्कट् पेऱु. (कुरळ 60)

पत्नीचे सद्‌गुण हेच घराचे मुख्य कल्याण आणि सुसंस्कारी मुले लाभणे, हाच त्यावरील दागिना.

सद्‌गुणसंपन्न पत्नी हे कुटुंबाचे मंगल होय; आणि उत्तम संतती ही त्या कुटुंबाची सर्वश्रेष्ठ शोभा होय.
कुटुंबाचे वैशिष्ट्य त्यातील चांगल्या संस्कारांत आणि पुढील पिढीला सन्मार्गावर घडवण्यात आहे.

तिरुक्कुरळातील कौटुंबिक सदाचार म्हणजे प्रेम, जबाबदारी, परस्पर वाटून घेण्याची वृत्ती आणि सुसंस्कारित पुढील पिढीची निर्मिती यांचा समन्वय होय. उत्तम समाज घडवायचा असेल, तर त्या समाजाची पहिली शाळा असलेले कुटुंब सदाचाराच्या पायावर उभे राहिले पाहिजे.

## 5.21. तिरुक्कुरळातील स्त्रिया

तिरुक्कुरळातील स्त्रियांविषयीचे विचार त्या काळातील सामाजिक पार्श्वभूमी लक्षात घेऊन समजून घेणे आवश्यक आहे. गृहस्थजीवन, जीवनसाथी, संततीप्राप्ती आणि प्रेमविभाग या भागांमध्ये स्त्रियांचे स्थान विविध दृष्टिकोनांतून व्यक्त झाले आहे. त्यांपैकी जीवनसाथीचे गुण, कुटुंबाचे व्यवस्थापन आणि नातेसंबंधांची सखोलता हे घटक महत्त्वाचे आहेत.

### गृहस्थजीवनातील स्त्रिया

कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीनुसार त्याचे योग्य प्रकारे व्यवस्थापन करणारी आणि कुटुंबाचा संसार समर्थपणे सांभाळणारी स्त्री जीवनसाथी म्हणून चित्रित केली आहे.

மனைத்தக்க மாண்புடையள் ஆகித்தற் கொண்டான்
வளத்தக்காள் வாழ்க்கைத் துணை. (குறள் 51)

मऩैत्तक्क माण्बुडैयळ् आहित्तऱ् कॊण्डाऩ्
वळत्तक्काळ् वाऴ्क्कैत् तुणै. (कुरळ 51)

पतीच्या शक्तीबाहेर खर्च करणाऱ्या पत्नीला
अनुकूलवाणी असणारी सद्गुणी भाऱ्या मानता येत नाही.

कुटुंबाला अनुरूप असे गुण असलेली आणि पतीच्या आर्थिक परिस्थितीनुसार संसार चालवणारी स्त्री हीच योग्य जीवनसाथी होय. या कुरळाच्या माध्यमातून तिरुवल्लुवर यांनी कुटुंबव्यवस्थेत स्त्रीची जबाबदारी आणि महत्त्व अधोरेखित केले आहे. तसेच, उत्तम गृहिणी नसेल, तर घराची प्रगती होऊ शकत नाही, हा विचार ते पुढील कुरळातून मांडतात.

*மனைமாட்சி இல்லாள்கண் இல்லாயின் வாழ்க்கை*

*எனைமாட்சித் தாயினும் இல்.* (குறள் 52)

मऩैमाट्चि इल्लाळ्कण् इल्लायिऩ् वाऴ्क्कै
ऎऩैमाट्चित् तायिऩुम् इल्. (कुरळ 52)

स्वधर्मापासून पत्नी चुकत असेल, तर बाकीची
सुखे असून नसल्यासारखी होतात.

पत्नीमध्ये गृहिणीला शोभणारे गुण नसतील, तर इतर कितीही वैभव असले, तरी त्या गृहस्थजीवनाला खरे वैभव प्राप्त होत नाही.
बाह्य साधनसंपत्ती कितीही असली, तरी कौटुंबिक जीवनातील आंतरिक गुणवत्ता नसेल, तर त्या जीवनाचे परिपूर्णत्व कमी होते, हा विचार या कुरळातून स्पष्ट होतो.

**प्रेमातील स्त्रीचा भावस्वर**

प्रेमविभागात नायिकेचे प्रेम, विरह, उत्कंठा आणि प्रेमकलह यांसारख्या अंतर्मनातील भावना स्वतंत्र स्वरात व्यक्त झाल्या आहेत. त्यामुळे तिरुक्कुरळात स्त्री केवळ कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडणारी व्यक्ती म्हणूनच नव्हे, तर सखोल भावना आणि स्वतःच्या इच्छा असलेली व्यक्ती म्हणूनही चित्रित झाली आहे. या भागातून जीवनसाथी म्हणून स्त्रीचे गुण, कुटुंबातील तिची महत्त्वपूर्ण भूमिका आणि प्रेमजीवनातील तिच्या भावनांचा स्वतंत्र स्वर हे पैलू स्पष्टपणे समोर येतात.

## 5.22. तिरुक्कुरळातील व्यवस्थापन

'व्यवस्थापन' ही संज्ञा तिरुक्कुरळात नसली, तरी नियोजन, मनुष्यबळाची निवड, समयसूचकता, योग्य स्थानाची निवड, जबाबदाऱ्यांचे वाटप, निर्णयप्रक्रिया आणि देखरेख यांसारखी व्यवस्थापनाची तत्त्वे अर्थविभागात व्यापकपणे आढळतात. कोणतेही कार्य करण्यापूर्वी नियोजन करणे आवश्यक आहे. मात्र, एकदा निर्णय घेतल्यानंतरही संकोच करत राहिल्यास कार्यक्षमतेवर परिणाम होतो. हा विचार पुढील कुरळातून व्यक्त होतो.

*எண்ணித் துணிக கருமம் துணிந்தபின்*

*எண்ணுவம் என்பது இழுக்கு.* (குறள் 467)

ऎण्णित् तुणिह करुमम् तुणिन्दपिऩ्
ऎण्णुवम् ऎऩ्बदु इऴुक्कु. (कुरळ 467)

पूर्ण विचार केल्यावाचून काहीही नक्की करू नको; आधी कार्‍याला आरंभ करून मागून मग विचार करीन असे जो मनात म्हणतो तो मूर्ख होय.

कोणतेही कार्य करण्यापूर्वी त्याचा विचार करून मगच ते हाती घ्यावे. एकदा निर्णय घेतल्यानंतर पुन्हा विचार करत बसणे ही चूक होय.

**मनुष्यबळ व्यवस्थापन**

योग्य व्यक्तीची निवड करणे, तिच्याकडे काम सोपवणे आणि निर्धारित वेळेत ते पूर्ण करून घेणे, यामध्ये मनुष्यबळाची भूमिका महत्त्वाची असते. उपलब्ध मनुष्यबळाचा कुशलतेने उपयोग केल्यास यशाचा मार्ग सुकर होतो. व्यवस्थापनशास्त्रात अशा विचारांना विशेष महत्त्व दिले जाते. तिरुक्कुरळातही हे विचार ठिकठिकाणी मांडले आहेत. त्यांपैकी एक कुरळ पुढीलप्रमाणे आहे.

இதனை இதனால் இவன்முடிக்கும் என்றாய்ந்து
அதனை அவன்கண் விடல். (குறள் 517)

इदऩै इदऩाल् इवऩ्मुडिक्कुम् ऎऩ्ऱाय्न्दु
अदऩै अवऩ्कण् विडल्. (कुरळ 517)

त्या त्या माणसाची पात्रता, शक्ती बघून मगच कोणत्याही कामाची जबाबदारी त्याच्यावर सोपवावी.

एखादे काम कोणत्या साधनांनी आणि कोणत्या व्यक्तीकडून यशस्वीपणे पूर्ण होऊ शकते, याचा विचार करून ते काम त्या व्यक्तीकडे सोपवावे.

कामाचे स्वरूप, ते पूर्ण करण्याची पद्धत आणि ते करणाऱ्या व्यक्तीची क्षमता यांचे मूल्यमापन केल्यानंतरच जबाबदारी सोपवावी. क्षमतेनुसार कामाचे वाटप करण्याचे हे एक महत्त्वपूर्ण तत्त्व आहे.

**वेळ आणि अंमलबजावणी**

एखाद्या कार्याच्या यशामध्ये योग्य वेळ आणि योग्य स्थान यांची भूमिका महत्त्वाची असते. त्यामुळे कार्य करताना या दोन्ही घटकांचा विचार करणे आवश्यक आहे, हे पुढील कुरळातून स्पष्ट होते.

ஞாலம் கருதினும் கைகூடும் காலம்
கருதி இடத்தாற் செயின். (குறள் 484)

ञालम् करुदिऩुम् कैकूडुम् कालम्
करुदि इडत्तार् सॆयिऩ्. (कुरळ 484)

जर जग जिंकण्याचा विचार असेल तरीही योग्य वेळ आणि योग्य जागा निवडून कार्य केल्यास ते सहज साध्य होऊ शकते.

योग्य वेळ आणि योग्य स्थान लक्षात घेऊन कार्य केले, तर संपूर्ण जग जिंकण्याचे उद्दिष्टही साध्य होऊ शकते.
योग्य वेळ आणि परिस्थिती ओळखून कार्य केले, तर मोठी उद्दिष्टेही साध्य करता येतात. म्हणूनच व्यवस्थापनात केवळ साधनसंपत्तीच नव्हे, तर वेळ आणि परिस्थिती यांनाही महत्त्वाची संसाधने मानले पाहिजे.

तिरुक्कुरळातील व्यवस्थापनविषयक विचारांमध्ये नियोजन, विचारपूर्वक परीक्षण, योग्य व्यक्तीची निवड, समयसूचकतेने कार्य करणे आणि दृढनिश्चयाने ते पूर्ण करणे या घटकांचा समन्वय दिसून येतो. उत्तम व्यवस्थापन म्हणजे अधिकाधिक कामे करणे नव्हे, तर योग्य काम योग्य पद्धतीने आणि योग्य वेळी पूर्ण करणे होय.

## 5.23. जगातील विविध भाषांमधील तिरुक्कुरळ

तिरुक्कुरळाची निर्मिती तमिळ भाषेत झाली असली, तरी त्यातील मूलभूत विचार मानवी जीवनातील सार्वत्रिक प्रश्नांना स्पर्श करतात. सदाचार, प्रेम, न्याय, मैत्री, शासन, शिक्षण, श्रम, कुटुंब आणि प्रेमजीवन हे विषय जगातील सर्व लोकांसाठी समान महत्त्वाचे आहेत. म्हणूनच तिरुक्कुरळाचा गौरव 'विश्वसार्वत्रिक धर्मग्रंथ' म्हणून केला जातो. विविध भाषांतील लोकांनी तिरुक्कुरळाचे आपल्या भाषांमध्ये अनुवाद करण्यामागील प्रमुख कारण म्हणजे त्यात समाविष्ट असलेले सार्वत्रिक विचार होय.

